पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ●अंक २७ ● रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

माणसाला आपल्या दारिद्र्याची लाज वाटता कामा नये. लाज वाटायला पाहिजे ती दुर्गुणांची.

सिटी न्यूज सुपरफास्ट
बार्शिटाकळी शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
आजम खान
तालुका प्रतिनिधी
+91 7875280943

## »थोडक्यात

### राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या नेतृत्वाला संधी!

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासंदर्भात एक महत्वाची बातमी समोर आली आहे. पक्षाचे जेष्ठ नेते शरद पवारांकडून पक्षात महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले आहे. पक्षाच्या युवकचे अध्यक्ष मेहबूब शेख आणि विद्यार्थीचे अध्यक्ष सुनील गव्हाणे यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर त्यांच्या जागी पक्षाच्या नव्या नियुत्तंया करण्यात आल्या आहेत. विद्यार्थी अध्यक्षपदी शुशील बेर्डे यांची प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत नियुक्ती करण्यात आली आहे. तर पक्षाच्या युवक अध्यक्षपदात विभागणी करून एक ग्रामीण आणि एक शहरी युवक अध्यक्ष नेमण्याचा पक्षांकडून निर्णय घेण्यात आला आहे. युवकच्या शहरसाठीच्या प्रदेशाध्यक्ष पदी विशाल वाकडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर यापूर्वी महाराष्ट्र युवती अध्यक्ष पद देताना देखील बदल करत शहर आणि ग्रामीणसाठी अध्यक्ष निवड करण्यात आली आहे. मनाली भिलारे शहरच्या युवती प्रादेशाध्यक्षा तर अमृता कालदाते ग्रामीणसाठी प्रदेशाध्यक्षा म्हणून नियुक्त करण्यात आली आहे

### अभिजित दिपकेंच्या वडिलांच्या संपत्तीची चौकशी करा!

नवी दिल्ली : कॉकरोच जनता पार्टीचे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दीपके यांचे वडील भगवान दीपके यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र सरकारमधील एका निवृत्त कर्मचाऱ्याने आपल्या मुलाच्या परदेशातील शिक्षणासाठी निधी कसा पुरवला, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. सुरतस्थित आरटीआय कार्यकर्ते अमित तिवारी यांनी ही मागणी केली आहे. तिवारी यांनी या संदर्भात निवडणूक आयोग आणि कर अधिकाऱ्यांना पत्र लिहून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. सीजेपी ही नोंदणीकृत संघटना नसून एक राजकीय पक्ष म्हणून कार्यरत आहे. ते म्हणाले की, जर १ कोटी रुपयांच्या कायदेशीर संरक्षण निधीचे आश्वासन दिले गेले असेल, तर निवडणूक आयोगाने सीजेपी ही नोंदणीकृत संघटना आहे की नाही याची पडताळणी करावी.

# विद्यापीठात आंधळ दळतंय आणि कुत्र पिठ खातयं!

## गुन्हा दाखल करण्यापूर्वी निलंबन टाळले कोणी ? डॉ. मानेंच्या किती चुका विद्यापीठाने पोटात घेतल्या ?

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात सध्या 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' असा अत्यंत संतापजनक कारभार सुरू असल्याचे चव्हाट्यावर आले आहे. तब्बल ३८.७३ लाखांचा भ्रष्टाचार, १३८ महत्त्वाच्या फायली गायब आणि ११५ बनावट देयकांचा घोटाळा (एम आय डी सी पोलिसात विद्यापीठाने दिलेल्या तक्रारी नुसार) समोर येऊनही दोषींवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्याऐवजी त्यांना अभय दिले जात असल्याने विद्यापीठ प्रशासनाच्या हेतूवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार तात्काळ निलंबनाची कारवाई करून निष्पक्ष विभागीय चौकशी सुरू करावी आणि ४ ऑगस्ट रोजी होणाऱ्या भरती प्रक्रियेचे अध्यक्षपद तात्काळ बदलण्यात यावे, अशी जोरदार मागणी प्रकल्पग्रस्त आणि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

विद्यापीठातील ७ तपासणी समित्यांच्या चौकशी अहवालानंतर तत्कालीन सहयोगी अधिष्ठाता डॉ. श्यामसुंदर माने यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, पोलिसांत तक्रार दाखल करण्यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार निलंबनाची कारवाई करणे कायदेशीररीत्या बंधनकारक होते. असे असतानाही, निलंबन टाळून थेट पोलिसांत प्रकरण ढकलण्याचा 'सल्ला' कोणी दिला ? प्रशासनाने हे निलंबन जाणीवपूर्वक का टाळले ? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. विद्यापीठाचे कुलसचिव नेमके काय करत आहे हा संशोधनचा विषय आहे. विद्यापीठाच्या हितासाठी पुण्यातील महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने या संपुर्ण प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी.



### मावळत्या कुलगुरूंचे काय चुकले ?

या संपूर्ण प्रकरणाच्या केंद्रस्थानी मावळते कुलगुरू डॉ. शरद गडाख यांची भूमिकाही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. गैरव्यवहाराचे गंभीर अहवाल हाती असतानाही त्यांनी कडक विभागीय चौकशी आणि निलंबनाचा बडगा का उभारला नाही ?. काही महिन्यात कुलगुरुंच्या निरोप समारंभ होणार आहे. अशा वेळी मावळत्या कुलगुरुंचे काय चुकले, की त्यांनी या भ्रष्टाचाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले ? असे सवाल आता विचारले जात आहेत.

### माने तरीही भरती समितीचे अध्यक्षपदी कसे?

एकीकडे गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप आणि पोलीस चौकशी सुरू असताना दुसरीकडे याच डॉ. माने यांच्याकडे 'प्रकल्पग्रस्त भरती प्रक्रियेच्या' निवड समितीचे अध्यक्षपद सोपवण्यात आले आहे. येत्या ४ ऑगस्ट रोजी होणारी भरती प्रक्रियेची बैठकही डॉ. माने यांच्याच अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. चौकशीच्या फेऱ्यात अडकलेल्या व्यक्तीच्या हाती हजारो तरुणांच्या भविष्याची दोरी सोपवून विद्यापीठ प्रशासन नेमके काय साध्य करू पाहत आहे. कुलसचिवांनी तत्काळ डॉ.माने यांच्याकडच्या सर्व खात्याची जबाबदारी काढण्याची गरज आहे. तसे न करण्यामागचा हेतु शोधला तर विद्यापीठ प्रशासन भविष्यात अडचणीत आल्याशिवाय राहणार नाही. पोस्ट उपलब्ध नसताना माने यांच्या आदेशने पोलिसात तक्रार करणाऱ्या भोयर यांच्या कार्यालयात माने यांनी केलेल्या महिलेच्या नियुक्तीचे काय अशी विचारणा होत आहे. विद्यापिठाने दाखल केलेल्या तक्रारीत एक महाभाग असे आहे की, ज्यांनी विद्यापिठ कर्मचाऱ्याचा मुलगा मृत्यू पावल्या नंतर त्याचे बिल काढण्यासाठी २५ लोकांची आईस्क्रिम पार्टी घेतली.

### प्रशासकीय निष्काळजीपणा व अनुत्तरित प्रश्न

डॉ. माने यांच्या अनेक गंभीर चुका आणि अनियमितता विद्यापीठ प्रशासनाने सातत्याने 'पोटात' घातल्याची जोरदार चर्चा विद्यापीठ वर्तुळात आहे. कोरोना काळातील कामांच्या नावाने १३ लाख ३२ हजार रुपयांची संशयास्पद देयके मंजूर करणे, अभियांत्रिकी विभागाची तांत्रिक मंजुरी न घेता कामांची किंमत ५० हजारांपेक्षा कमी दाखवून नियमांना बगल देणे, तसेच एकाच कामाच्या देयकांवर दुबार रकमा उकळणे असे अनेक कारनामे समोर आले आहेत. अनेक विद्यार्थी, विद्यार्थीनींच्या डॉ.माने यांच्या विषयीच्या निनावी तक्रारी आहे. त्या तक्रारींचे कुलगुरु, कुलसचिवांनी काय केले अशी विचारणा होत आहे.

# दोन बनावट गुटखा फॅक्टरी प्रकरण व मकोका

## एफडीए आयुक्त तुकाराम मुंढेंच्या कडक पवित्र्याने अकोला पोलिसांवर ताण




प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला / अमरावती :** अकोल्यातील एमआयडीसी परिसरामध्ये उघडकीस आलेल्या दोन बनावट गुटखा निर्मिती फॅक्टरीच्या प्रकरणात आता एक नवीन आणि मोठा वळण आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत आरोपींवर 'मकोका' कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत अमरावती येथे आर आर सी न्यूजच्या प्रतिनिधी सोबत बोलताना दिले आहेत. या कडक इशाऱ्यामुळे गुटखा माफियांचे धाबे दणाणले असून, अकोला पोलिसांवरील तपासाचा ताण आणि जबाबदारी दोन्ही वाढली आहे.

१६ जुलै रोजी अन्न व औषध प्रशासन आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एमआयडीसी परिसरात दोन स्वतंत्र धाडी टाकून दोन अवैध बनावट गुटखा कारखान्यांचा भांडाफोड केला होता. राज्यात गुटखाबंदी लागू असताना इतक्या मोठ्या प्रमाणावर थेट कारखान्यातच गुटख्याचे उत्पादन सुरू असल्यामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली होती. तो ही बनावट गुटखा असल्याने या प्रकरणाची गंभीरता वाढली आहे. अमरावती दौऱ्यावर असताना एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी यांनी विषयी गंभीर भाष्य केले आहे.

> 'मकोकाची कारवाई करण्याची एक ठरावीक कायदेशीर प्रक्रिया असते. तपास सुरू असून कायद्यातील कलमांनुसार योग्य ती कडक कारवाई केली जाईल.'
>
> **-तुकाराम मुंढे,** आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र शासन

# सातरगाव बनावट दारु प्रकरण भरारी पथकाने एकास घेतले ताब्यात

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला :** बाळापूर तालुक्यातील सातरगाव येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने उघडकीस आणलेल्या तब्बल ३२ लाख रुपयांच्या बनावट दारू कारखान्याप्रकरणी आता स्थानिक प्रशासकीय यंत्रणा आणि गावच्या पोलीस पाटलांच्या भूमिकेवर तीव्र संशय व्यक्त केला जात आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर दारूचे उत्पादन आणि वाहतूक सुरू असताना स्थानिक यंत्रणेला याचा पत्ता कसा लागला नाही, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या धाडीनंतर, मोहम्मद जावेद मोहम्मद हातम (वय ४२) या आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. चौकशीदरम्यान जावेदनं दारू निर्मितीबाबत मोठा खुलासा केला असून, यात दिलु ठाकूर उर्फ समरसिंह चंदनसिंह याचे नाव समोर आले आहे. सातारगाव येथील शेत सर्व्हे क्र. १२/२ मधील कांदा चाळ, विहीर आणि एक खोली सतीश सिंह पेंदिले यांनी १ जुलै २०२६ रोजी जावेदला एका वर्षाच्या करारावर भाड्याने दिली होती.या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि सूत्रधार अद्याप फरार असल्याने उत्पादन शुल्क विभागाच्या पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मुख्य आरोपीचा शोध घेण्यासोबतच स्थानिक पातळीवर कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

RRC News सिटी न्यूज सुपरफास्ट IMPACT

### स्थानिक यंत्रणा झोपली होती का ?

कारखान्यातून हजारो बनावट दारूच्या बाटल्या, स्पिरिट, बनावट लेबल्स, पॅकिंग साहित्य आणि ऑटोमॅटिक बॉटलिंग मशीन जप्त करण्यात आली आहे. दररोज हजारो बाटल्या आणि स्पिरिटची वाहतूक होत असताना गावातील पोलीस पाटील, कोतवाल किंवा स्थानिक बीट अंमलदारांना याची खबर नसावी, यावर कुणाचाही विश्वास बसत नाही. पोलीस पाटील हे गावातील कायदा व सुव्यवस्थेची माहिती वरिष्ठ पोलीस व महसूल प्रशासनाला देणारे मुख्य दुवे मानले जातात. मग इतका मोठा कारखाना सुरू असताना माहिती असूनही दुर्लक्ष करण्यात आले की यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरली, याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

# दिल्ली पोलिसांचा 'डिजिटल स्ट्राईक'!

**दिल्ली :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'चे (सीजेपी) आंदोलन आणि 'संसद मोर्चा' दरम्यान घडलेल्या घटनांनंतर आता दिल्ली पोलिसांच्या तपासाचा मुख्य फोकस सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वळला आहे. पोलिसांनी या आंदोलनाशी संबंधित व्हिडीओ, पोस्ट, कमेंट्स, लाईव्ह स्ट्रीम आणि इतर डिजिटल कंटेंटची पाहणी सुरू केली आहे.

दिशाभूल करणारी माहिती, आक्षेपार्ह मजकूर किंवा हिंसेशी संबंधित निवडक व्हिडीओ प्रसारित करणाऱ्या कंटेंन्टवर विशेष लक्ष केंद्रित केलं जात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांची नजर केवळ आंदोलनात प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या लोकांपर्यंतच मर्यादित नाही. आंदोलनादरम्यान किंवा त्यानंतर सातत्याने व्हिडीओ आणि पोस्ट शेअर करणाऱ्या युट्यूबर्स, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स आणि डिजिटल कंटेंट क्रिएटर्सच्या भूमिकेचीही सखोल चौकशी केली जात आहे. या तपासात काही सोशल मीडिया आधारित न्यूज पोर्टल आणि इतर डिजिटल प्लॅटफॉर्म्सची भूमिकाही तपासली जात असल्याचं समोर आलं आहे.



# परिवहन उपायुक्तांच्या ताटात शिळा सांभार!

## आरटीओची गूढ गुप्तता अन् 'त्या' हॉटेलचे ट्रक कनेक्शन!

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला :** 'जितके मोठे हॉटेल, तितकाच मोठा झोल!' असाच काहीसा संतापजनक आणि धक्कादायक प्रकार नुकताच समोर आला असून, थेट परिवहन उपायुक्तांसारख्या बड्या अधिकाऱ्यालाच हॉटेल चालकाने शिळा सांभार वाढून 'फूड पॉयझनिंग'चा झटका दिला आहे. या प्रकारानंतर प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असली, तरी याहून मोठा सवाल आता उपस्थित होत आहे— लाखांचा हप्ता मारणाऱ्या 'त्या' हॉटेलविरोधात आर टी ओ ने अद्याप तक्रार का केली नाही ? की या हॉटेल मालकाच्या ट्रकच्या हप्त्यांपुढे आरटीओच्या 'साहेबां'चे हात बांधले गेले आहेत ? असा प्रश्न विचारला जात आहे. मिळालेल्या खळबळजनक माहितीनुसार, परिवहन उपायुक्त दौऱ्यावर असताना शहरातील एका नामांकित अन् चकचकीत हॉटेलमध्ये भोजनासाठी थांबले होते. 'मोठे हॉटेल' म्हणून विश्वासाने ताट समोर आले, पण त्या ताटात चक्क शिळा अन् दुर्गंधीयुक्त सांभार वाढण्यात आला. उपआयुक्तांनी जेव्हा तो सांभार खाल्ला, तेव्हा त्यांना तत्काळ लक्षात आले की समोर वाढलेला सांभार विटलेला आहे. परिवहन उपायुक्त यांच्यासोबत ही घटना घडली असली तरी ती सामान्य ग्राहकासोबत घडली असली तरी मोठी चुक आहे. अकोल्यातील अन्न व औषध प्रशासन विभागाने या घटनेची गंभीर दखल घेत संबंधित हॉटेलचे लायसन्स रद्द करण्याची गरज आहे. हॉटेल्सचे झगमगाटी रोषणाई, एसी रूम्स आणि चकचकीत काउंटर पाहून भुलणाऱ्या सामान्य जनतेसाठी ही धोक्याची घंटा आहे. जिथे थेट परिवहन उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याला शिळे अन् विषारी अन्न खायला दिले जाते, तिथे सामान्य नागरिकांच्या आरोग्याशी किती खेळ चालला असेल, याची कल्पनाच न केलेली बरे!




### हप्त्याची वाफ इतकी की बस....

शहरात आता एकच चर्चा रंगली आहे—'त्या नामांकित हॉटेल चालकाचे ट्रकच्या हप्त्याला इतके काय बांधिलकीचे संबंध आहेत का?' की दरमहा होणाऱ्या मोठ्या 'आर्थिक देवाणघेवाणी'मुळे आरटीओने आपल्याच साहेबांच्या तब्येतीचा सौदा करत मौन बाळगणे पसंत केले ? आरटीओच्या या संशयास्पद भूमिकेमुळे खात्यातीलच काही प्रामाणिक अधिकाऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. आता या संपूर्ण 'शिळ्या सांबार' प्रकरणावर वरिष्ठ पातळीवरून काय कारवाई होते, की हप्त्यांच्या वाफेखाली हा विषय दडपला जातो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे !

# राज्यात धर्मांतरविरोधी कायदा लागू!

## बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांना चाप; सात वर्षांच्या शिक्षेची तरतूद

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**मुंबई :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर आणि अधिकृत राजपत्रात (गॅझेट) प्रकाशित झाल्यानंतर राज्यात धर्मांतर-विरोधी कायदा - 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा, २०२६' आता राज्यात लागू झाला आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार हा कायदा ३० जुलै रोजी अधिकृत राजपत्रात प्रकाशित झाला आणि त्याच तारखेपासून तो अंमलात आला. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार आता राज्यात बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये नवीन कायद्यातील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.



विधानसभेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी), समाजवादी पक्ष आणि सीपीआय (एम) यांनी या विधेयकाला विरोध केला होता, मात्र शिवसेना (यूबीटी) ने त्याला पाठिंबा दिला होता. विरोधकांची अशी मागणी होती की हे विधेयक संयुक्त निवड समितीकडे पाठवले जावे.

या कायद्याचे समर्थन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते की, बळजबरीने किंवा फसवणूक करून होणाऱ्या धर्मांतराला आळा घालणे हा याचा उद्देश आहे; स्वेच्छेने होणारे धर्मांतर किंवा आंतरधर्मीय विवाह यांना लक्ष्य करणे हा याचा उद्देश नाही. मध्य प्रदेश, ओडिशा, छत्तीसगड, उत्तर प्रदेश आणि हिमाचल प्रदेश यांसारख्या किमान १२ राज्यांमध्ये यापूर्वीच धर्मांतर-विरोधी कायदा अस्तित्वात आहे. तसेच झारखंड, कर्नाटक, हरियाणा आणि राजस्थानमध्येही असे कायदे आहेत.

### फसवणूक, आमिष, चुकीची माहितीला प्रतिबंध

हा कायदा विधिमंडळाने मार्चमधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केला होता आणि त्यानंतर तो मंजुरीसाठी राज्यपाल व नंतर राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आला होता. हा कायदा बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती किंवा लग्नाचे आश्वासन देऊन केल्या जाणाऱ्या धर्मांतरास प्रतिबंध करतो.



# हुंडा प्रथा : एक सामाजिक अभिशाप



इद्रीस खान
पुसद

आज आपल्या भारत देशात प्रत्येक समाजात विवाहाच्या संदर्भात अनेक प्रथा व रूढी प्रचलित आहेत. त्यापैकी हुंडा ही सर्वात गंभीर सामाजिक समस्या आहे. दुर्दैवाने या कुप्रथेतून मुस्लिम समाजही पूर्णपणे मुक्त झालेला नाही. काही समाजांमध्ये विवाहाच्या वेळी वधूपक्षाकडून वरपक्षाला आर्थिक मदत, वस्तू किंवा संपत्ती देण्याची प्रथा रूढ झाली आहे. मात्र इस्लाममध्ये विवाहाच्या बाबतीत वधूपक्षावर कोणतीही आर्थिक जबाबदारी टाकलेली नाही. उलट वरपक्षाने आपल्या आर्थिक क्षमतेनुसार विवाहाचा खर्च करणे, पत्नीसाठी आवश्यक वस्तूंची व्यवस्था करणे आणि मेहर अदा करणे ही त्याची जबाबदारी आहे.

आज अनेक ठिकाणी मेहरला दुय्यम स्थान दिले जाते. मेहरची रक्कम अत्यंत कमी ठेवली जाते आणि तीही अनेकदा उधारीवर ठेवली जाते. परंतु इस्लामने स्पष्टपणे निषिद्ध ठरविलेला हुंडा मात्र मोठ्या प्रमाणात घेतला जातो. इतकेच नव्हे तर त्याचे प्रदर्शन करून त्याची जाहिरात केली जाते. अशा प्रकारे हराम मार्गाने मिळालेल्या संपत्तीचे प्रदर्शन पाहण्यासाठी लोक जमतात आणि त्याचे कौतुकही करतात. परिणामी अधिकाधिक हुंडा मिळविण्याची अपेक्षा व लालसा वाढत जाते.

ही गोष्ट केवळ वधूपक्षासाठीच नव्हे तर वरपक्षासाठीही लाजिरवाणी आहे. स्वतःच्या कष्टाने संसार उभारण्याऐवजी वधूपक्षाकडून मिळालेल्या संपत्तीवर संसार उभारण्याची मानसिकता स्वाभिमानाला शोभणारी नाही. भविष्यातील पत्नी किंवा तिच्या कुटुंबाकडून हुंड्याची मागणी करणे, अथवा स्वेच्छेने दिला जात आहे या नावाखाली तो स्वीकारणे, ही वृत्ती स्वाभिमानी व्यक्तीची नसून याचक वृत्तीचे प्रतीक आहे.

यासंदर्भात एक साधे उदाहरण विचारात घेऊया. एखाद्या व्यक्तीशी आपली घनिष्ठ मैत्री असते. त्या मित्राला एखाद्या कामासाठी आपली मदत हवी असते आणि आपण ती आनंदाने करतो. परंतु त्याच कामासाठी तो मित्र आपल्याकडे पैशांची किंवा भेटवस्तूची मागणी करू लागला, तर आपल्याला कसे वाटेल? ज्या मुलीसोबत संपूर्ण आयुष्य व्यतीत करायचे आहे, जी आपल्या मुलाबाळांचे संगोपन करणार आहे, घराची जबाबदारी सांभाळणार आहे आणि आपल्या जीवनातील सुख-दुःखाची भागीदार होणार आहे, तिच्याकडून किंवा तिच्या कुटुंबाकडून हुंड्याची अपेक्षा करणे कितपत योग्य आहे, याचा प्रत्येक तरुणाने गांभीर्याने विचार करायला हवा.

दुर्दैवाची बाब म्हणजे अनेकदा मुलीच्या विवाहावेळी पालक आनंदाने हुंडा देतात; परंतु मुलीला तिच्या कायदेशीर आणि नैतिक वारसाहक्कापासून वंचित ठेवतात. प्रत्यक्षात वारसाहक्क हा मुलीचा शरियत आणि कायद्यानुसार असलेला अधिकार आहे. त्यामुळे हुंडा देण्याऐवजी मुलींना त्यांचा योग्य वारसा देण्याची मानसिकता समाजात निर्माण होणे आवश्यक आहे.


मेहर अदा करण्याच्या संदर्भात प्रेषित मुहम्मद (स.) यांनी स्पष्ट मार्गदर्शन केले आहे. त्यांनी सांगितले की, ज्याने मेहर निश्चित करून विवाह केला, परंतु मनात तो मेहर अदा करण्याचा इरादा नव्हता, तो गंभीर पापाचा भागीदार ठरतो. यावरून मेहर अदा करणे किती महत्त्वाचे आहे हे स्पष्ट होते.

हुंडा प्रथा जिवंत ठेवण्यात केवळ सामान्य लोकच नव्हे तर काही धार्मिक, सामाजिक आणि राजकीय नेत्यांचाही अप्रत्यक्ष वाटा आहे. अनेक जण व्यासपीठावरून हुंड्याविरोधात प्रभावी भाषणे करतात, त्याचे दुष्परिणाम मांडतात; परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र हुंडा घेणे किंवा देणे याला विरोध करत नाहीत. अशा दुटप्पी भूमिकेमुळे समाजात चुकीचा संदेश जातो.

आजच्या समाजाने आणि विशेषतः तरुण पिढीने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की स्त्री ही वस्तू नसून एक सन्माननीय व्यक्तिमत्त्व आहे. ती आई, बहीण, मुलगी, पत्नी आणि सून अशा अनेक नात्यांनी समाजाला समृद्ध करते. तिचे मूल्य धन, दागिने किंवा हुंड्याने मोजता येत नाही. स्त्रीला संपत्ती मिळविण्याचे साधन समजण्याची मानसिकता बदलणे ही काळाची गरज आहे.

समाजातील प्रत्येक तरुणाने "मी हुंडा घेणार नाही" आणि प्रत्येक पालकाने "मी हुंडा देणार नाही" असा निर्धार केला, तर ही सामाजिक कुप्रथा निश्चितपणे नष्ट होऊ शकते. स्त्रीचा सन्मान, तिचे अधिकार आणि तिची प्रतिष्ठा जपणारा समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि सुसंस्कृत समाज ठरतो.

# अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांचा आज स्मृतिदिन



अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल यांचे सगळ्यात महत्त्वाचे संशोधन म्हणजे दूरध्वनी. दूर अंतरावर असलेल्या आपल्या प्रिय व्यक्तिचा आवज काही सेकंदात आपल्यापर्यंत पोहोचविणारे यंत्र असावे, असे वाटत असल्याने बेल यांनी दूरध्वनी यंत्राचा शोध लावला.१८८५ मध्ये ते अमेरिकन टेलिफोन कंपनीचे सह-संस्थापक सुद्धा होते. बेल यांचा जन्म ३ मार्च १८४७ रोजी एडिनबरा, स्कॉटलंड येथे झाला. त्यांचे आजोबा, वडील - अलेक्झांडर मेलव्हिल बेल आणि भाऊ या सगळ्यांचा मूक-बधिरांच्या शिक्षणाशी जवळचा संबंध होता. तर त्यांची आई आणि पत्नी या दोघीही कर्ण बधिर होत्या. लहानपणी अलेक्झांडर हे नाव ठेवण्यात तरी वयाच्या ११ व्या वर्षी स्वतःच्या नावात ग्रॅहॅम नाव टाकून घेऊन मग अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल या नावाने पुढे ते ओळखले जाऊ लागले. मूक-बधिरांसाठी शिक्षण सुलभ व्हावे, त्यांना इतरांचे बोलणे कळावे यासाठी अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल सतत प्रयत्नशील होते. त्यासाठी बोस्टन विद्यापीठात स्वरयंत्राचे कार्यशास्त्र शिकविण्यासाठी नेमण्यात आले. तेथेच बधिरांसाठी यंत्र तयार करण्याचे प्रयत्न बेल करीत होते. असे यंत्र बनविण्याच्या प्रयत्नात बेल असतांनाच ते मेबल ह्यूबर्ड नावाच्या कर्ण बधिर मुलीच्या प्रेमात पडले आणि तिच्याशी त्यांचा विवाह झाला. पत्नीला बेलच्या यंत्राविषयी कळल्यावर तिनेच ओठांची हालचाल वाचता येणे हाच बधिरांसाठी कसा सर्वोत्तम पर्याय आहे हे पटवून सांगितले. मग बेल यांनी तसे यंत्र बनविण्याचे प्रयत्न सुरू केले आणि त्यातच दूरध्वनी यंत्राचे कोडे उलगडले. बेल यांनी माणसाच्या स्वरयंत्राचा आणि कानाचा अभ्यास करून पहिले दूरध्वनी यंत्र तयार केले. २ जून १८७५ या दिवशी आपले सहकारी वॉटसन यांच्यासह काम करीत असताना दुसऱ्या खोलीतील वॉटसन यांच्या हाताच्या धक्याने ट्रान्समीटर थरथरला, तो लहानसा आवाजही बेल यांना ऐकू आला. मग बेल यांनी आपल्या ट्रान्समीटरचा उपयोग करून सहकारी वॉटसन यांना आपल्या खोलीत येण्याविषयी सांगितले. बेल यांचा तो संदेश सहकारी वॉटसन यांनी ऐकून तसा प्रतिसाद दिल्यावर संदेशाची देवाणघेवाण झाल्याबद्दल दोघांची खात्रीच पटली. बेल आणि वॉटसन यांनी या यंत्रावर आणखी प्रयोग करून १५-०२-१८७६ या दिवशी आपल्या यंत्राचे पेटंट घेण्यासाठी अर्ज दाखल केला. तेव्हा पेटंट कार्यालयातच बेल यांना समजले.

# जाधव दाम्पत्याची रानभाजीची शेती!

आज कालच्या धावपळीच्या युगामध्ये आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याचे पाहायला मिळते. रासायनिक पालेभाज्या व अन्नपदार्थ खाल्ल्यामुळे अनेक शारीरिक व्याधींचा सामना करावा लागतो. मात्र या सर्वावर मात करत खेड तालुक्यातील चिंबळी येथे असणाऱ्या जाधव दाम्पत्याने रानभाज्यांच्या शेतीतून निरोगी पौष्टिक रानभाज्या पिकून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न केला आहे. रानभाज्याच्या शेतीतून ते नागरिकांना रासायन मुक्त पालेभाज्या, फळभाज्या खायला देत आहेत.

सीमा जाधव आणि चंद्रकांत जाधव हे खेड तालुक्यातील चिंबळी येथील रहिवासी आहेत. सीमा जाधव यांच्या घरी म्हणजे माहेरी शेती नसल्याने त्यांना शेतीतलं कुठलंही ज्ञान नव्हते. मात्र पतीच्या सहकार्याने अवघ्या बारावी पास असलेल्या सीमा यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत रानभाज्याच्या शेतीचा प्रयोग करण्यात यश मिळवले आहे. अनेक वर्षांपासून हे दाम्पत्य रानभाज्यांचा यशस्वी प्रयोग करत आहेत. त्यातून त्यांना चांगले उत्पन्न देखील मिळत आहे. या रानभाज्यांची विक्री करताना शेतकरी ते ग्राहक असा टप्पा त्यांनी आखून घेतला आहे. त्यामुळे मधी कुठलाही व्यापारी न जाता थेट या रानभाज्यांचे पैसे शेतकऱ्यांना मिळत आहेत.

# राजकारणातील शब्दास्त्रांचे मानसशास्त्र



**गेल्या काही वर्षांत सार्वजनिक जीवनात एक वैशिष्ट्यपूर्ण घटना मधून मधून घडतांना दिसत आहे. त्याची उदाहरणे समोर ठेवतो, म्हणजे त्याविषयी आपोआप स्पष्टता होईल. एकाने दुसऱ्याला 'आंदोलनजीवी', 'अर्बन (शहरी) नक्षल' म्हटले. लगेच दुसऱ्याच्या अनेक अनुयायांनी ते जणू बिरूद म्हणून सामाजिक माध्यमांवर स्वत:साठी वापरायला प्रारंभ केले.**

(डॉ.) दुर्गेश सामंत
गोवा

बाकी पुढे काय होत आहे, हे आपण आता पहात आहोतच. येथे विचार करायचा आहे की, एकाने कुणाला हीन किंवा नकारात्मक संबोधन केले, तर दुसऱ्याने वा त्याच्या पाठीराख्यांनी ते स्वत:ला बिरूद म्हणून लावून घेणे आणि त्यातून पुढे काही समाजमानसात हालचाल होणे, या प्रकारच्या घटनेचा. येथे या प्रकारच्या घटनेचा लोकमानसावर कसा परिणाम होतो, हे पहायचे आहे. आपण बांगलादेशातील उदाहरणाच्या आधारे हे समजून घेणार आहोत.

**१. बांगलादेशामध्ये काय घडले ?**

बांगलादेशामध्ये शेख हसीना यांनी त्यांच्या सत्तेच्या शेवटच्या काही दिवसांत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्या काळात सर्वत्र आंदोलन करत असलेल्या समुदायाला उद्देशून त्यांना 'रझाकार' असे संबोधले. 'रझाकार' हा शब्द तेथे दुष्प्रवृत्ती, देशद्रोह, अत्याचारी, बलात्कारी इत्यादी निदर्शक आहे. वर्ष १९७१ च्या काळात पाक सैन्याला साथ देत ज्या बांगलादेशवासियांनी स्वतःच्याच देशबांधवांवर जे अनन्वित अत्याचार केले, त्यांना उद्देशून हा शब्द होता. प्रत्यक्षात असे झाले की, दुसऱ्या दिवशी ज्या आंदोलकांना उद्देशून शेख हसीना यांनी म्हटले होते, तेच सगळे आंदोलक स्वतःला 'आम्ही रझाकार', असे म्हणत घोषणा देत फिरू लागले. त्यांचे आंदोलन वाढले आणि पुढे काय झाले, हे सर्वांना ठाऊक आहे.

बांगलादेश हिंसाचार

**२. बांगलादेशाचे उदाहरण का ?**

हा लेख बांगलादेशाची राजकीय परिस्थिती किंवा अन्य काही राजकीय टिपणी करणे यांविषयी नाही. हे उदाहरण घ्यायचे कारण, म्हणजे हे शेजारी राष्ट्रात; परंतु भारतीय उपखंडात घडले आहे. या उपखंडाच्या इतिहासात संज्ञांना लाभलेल्या अर्थांमध्ये काही समानता आहे. तेथे या घटनेचा प्रभाव निर्माण होऊन परिणाम स्पष्ट झाले आहेत. तेथे दिसलेले परिणाम व्यापक होते. सर्वांत महत्त्वाचे, म्हणजे हा अभ्यास करण्यासाठी जी काही तटस्थता लागते, ती हे प्रकरण दुसऱ्या देशात घडल्यामुळे सहजतेने होऊ शकते.

**३. मानसशास्त्रीय प्रकटन**

जेव्हा एखादी राजकीय व्यक्ती आपल्या विरोधकांवर डाग लावण्यासाठी 'रझाकार'सारख्या ऐतिहासिक दृष्टीने कलंकित शब्दाचा वापर करते आणि ज्यांच्यावर हा आरोप झाला आहे, तो गट जाहीरपणे 'आम्ही सगळे रझाकार आहोत', अशा घोषणा देऊन त्याला उत्तर देतो, तेव्हा 'भाषिक पुनराधिकार' म्हणून ओळखली जाणारी एक मानसशास्त्रीय प्रक्रिया घडते. ज्यात त्या संज्ञेच्या ओळखीसाठी असणारा इतिहासात प्रस्थापित, तसेच योग्य संदर्भासहित आधार कमकुवत केला जातो.

**४. प्रक्रियेचे हेतू साध्य करणारे परिणाम**

हे महत्त्वाचे आहेत. ज्यामुळे पुढे होणाऱ्या घडामोडींची दिशा ठरते. अ. शब्दशस्त्रातील शक्ती नष्ट करणे : 'कलंकित' शब्द स्वतःची ओळख म्हणून स्वतःहून स्वीकारल्याने त्या शब्दातील एरव्ही असणारी भावनिक क्लेश किंवा बोच नष्ट होते. अपशब्दच चिलखत बनल्याने समोरचा माणूस त्याचा वापर आता शस्त्र म्हणून करू शकत नाही. बांगलादेशातील आंदोलकांनी 'रझाकार' या शब्दाचा त्या आरोपातील फोलपणा सिद्ध करण्यासाठी आणि शक्तीचा समतोल उलटवण्यासाठी या उपरोधिक स्वीकार केला. आ. दर्पण परिणाम : येथे लोकांमध्ये प्रचलित रझाकार शब्दाच्या मूळ नकारात्मक व्याख्येशी स्वतःला न जोडता आंदोलकांनी त्याचा वापर आपल्यावर झालेल्या आरोपाची निरर्थकता आणि हास्यास्पदता दाखवण्यासाठी एका आरशासारखा केला, जणू यातून आरोप करणाऱ्यावरच नकारात्मकता उलटली. हा दर्पण परिणाम. इ. समविचारींचे अल्पावधीत एकत्रीकरण आणि सक्रियता : राजकीय घटनाक्रमात अन् डावपेचांत विखुरलेल्या जनसमुदायाला एकत्र आणण्यासाठी एका वेगवान आणि प्रभावी घटकाची आवश्यकता असते. जेव्हा विखुरलेल्या आणि सक्रीय नसलेल्या समुहावर सामूहिकरित्या एकच अपमानकारक शब्द फेकला जातो, तेव्हा त्यातून एक समान दुःख निर्माण होते. या अपकीर्तीकारक 'लेबल'चा स्वतःहून स्वीकार केल्याने अन्यायाची वैयक्तिक आणि एकाकी भावना एका सामूहिक सन्मानात अन् बंडखोरीच्या प्रतीकांत पालटून जाते. हा समूह लगेच एकत्र येणे आणि सक्रीय बनणे, हे अल्पावधीत होते. बांगलादेशामधील आंदोलन मग पुष्कळच तीव्र बनले. ई. आक्रमकता आणणे : एखादा आरोप नाकारल्याने (उदा. आम्ही देशद्रोही नाही) आरोपी व्यक्ती बचावात्मक भूमिकेत जाते आणि तिला आरोप करणाऱ्याने ठरवून दिलेल्या चौकटीतच उत्तर देणे भाग पडते. याउलट तेच 'लेबल' जाणीवपूर्वक वर उल्लेखित प्रकाराद्वारे उलटवून लावणे, हा निष्क्रीयतेकडून सक्रियतेकडे झालेला एक मानसिक पालट असतो. याद्वारे दिला जाणारा मानसिक संदेश पालटतो. सामान्य प्रतिक्रिया 'कृपया आमच्या निरपराधत्वावर विश्वास ठेवा', अशी असते. येथे नवीन संदेश 'आमच्या देशभक्तीची परीक्षा घेण्याचा तुमचा अधिकारच आम्ही नाकारतो', असा बनतो. या सगळयाचा दृश्य परिणाम काय होतो, ते आपण पाहिला आहे.

**५. परिणामाची दुसरी बाजू**

या घटनेला किंवा प्रक्रियेला मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून दुसरी बाजूही आहे. अशा प्रकारच्या प्रसंगामध्ये जे घडते ती मानसशास्त्रीयदृष्ट्या एक मानसिक बचाव प्रक्रिया असते. ही प्रक्रिया व्यक्ती, समाज आणि एकंदरीत मानवता यांवर अत्यंत खोल अन् दीर्घकालीन परिणाम करू शकते. अ. वापर करणाऱ्या व्यक्तींवर परिणाम : कोणताही शब्दप्रयोग केला जातो तो काही उद्देशाने. त्याचा परिणाम त्या त्या व्यक्तीवर होणे स्वाभाविक आहे. व्यक्तिगत जीवनात हे घडत असते; परंतु त्याचे परिणाम त्या त्या परिवारापुरते मर्यादित रहातात.



# मातेने सजग असण्याची गरज!

सौ.नेहा इंगळे
8007505881



दरवर्षी 1 ऑगस्ट ते 7 ऑगस्ट या कालावधीत जगभरात जागतिक स्तनपान सप्ताह (Worlds Breast-feeding week) साजरा केला जातो. या सप्तहाचा उद्देश स्तनपानाचे महत्व समाजापर्यंत पोहचवणे, माता व बालकांच्या आरोग्याबद्दल जनजागृती करणे आणि प्रत्येक बाळाला जीवनाच्या सुरुवातीपासून सरोत्तम पोषण मिळावे यासाठी प्रोत्साहन देणे हा आहे. हा उपक्रम जागतिक आरोग्य संघटना (WHO) युनिसेफ(UNICEF) आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविला जातो.

आईचे दूध हे सर्वोत्कृष्ट पोषणाचे स्त्रोत असल्याचे मानण्यात येते.जन्मानंतर पहिल्या अर्ध्या तासातच बाळाला दूध ओढण्याची शक्ती देऊन स्तनपान करण्याची गरज आहे. कारण स्तनपान हे सुद्धा प्रजनन क्रियेमधील एक भाग आहे. यामुळे आई व मूल यांच्यामधील नैसर्गीक नाते निर्माण होऊन आईचे दूध हे बाळासाठी निर्जंतुक आहार आहे. आईच्या दुधामधून बाळाला सर्व पोषक घटक मिळत असल्याने त्याची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

आईच्या दुधाचे तापमान हे शरीराच्या सामान्य तापमानाइतके असल्यामुळे बाळाच्या दृष्टीने ते योग्य ठरते. स्तनपानामुळे आईच्या गर्भाशयाच्या अंकुचित आकार पूर्वीसारखा होण्यास मदत होते. म्हणून स्तनपान, त्याच्या पद्धती,वेळा याविषयी प्रत्येक मातेने सजग असण्याची गरज आहे.प्रत्येक स्तनपानापूर्वी मातेने आपले स्तनाग्रे कोमट पाण्यांनी स्वच्छ धुण्याची गरज आहे. स्वच्छ कपडे,यामुळे बाळास स्तनपान करताना प्रसन्न वाटेल. स्तनपान करताना आईच्या मनावर कुठलेही दडपण नसावे. बाळाला दूध देताना स्तन चोखणे व दूध ओढणे ही प्रक्रिया सामान्यपणे होण्याची गरज आहे.

स्तनपानामुळे बाळाचे पोट भरते की नाही याचा अंदाज मातेनी घ्यावा व याप्रमाणे आपल्या आहाराचे नियोजन करावे. आपल्या दुधाचा पुरेपूर फायदा बाळाला मिळण्यासाठी आहार नियोजन करण्याची गरज आहे. म्हणूनच पहिले ६ महिने बाळ व माता अधिकाधिक वेळ एकत्रित कसे राहता येईल याचा विचार करण्याची गरज आहे. हे करत असताना ज्या स्तनदा माता,गृहिणी आहे त्यांना घरीच असल्यामुळे फारशी अडचण जाणवत नाही. तर नोकरीनिमित्य घराबाहेर जाणाऱ्या मातांना स्तनपान व स्तनपानाच्या वेळ सांभाळणे अडचणीचे होते.

मातृत्व हे स्रीच्या जीवनातील अतिशय महत्वाचे स्थान असून प्रत्येक स्त्रीला मातृत्व अभावी आपले जीवन निरस व अपूर्ण वाटते. मातृत्वाची धुरा सृजनतेने व यशस्वीपणे पेलून बाळाला जन्म देणे. याचबरोबर स्वतःच्या व बाळाच्या प्रकृतीची काळजी घेणे, स्वतःचे शारीरिक,मानसिक आरोग्य सांभाळणे हे बालसंगोपनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. शारीरिक झीज व भावनिक गुंतवणूक याचबरोबर शास्रीय दृष्टिकोन,ममत्व, धैर्य,चिकाटी या सर्वांचा यथायोग्य वापर करून बाळाच्या संगोपनाची जबाबदारी उचलायची असते. प्रत्येक स्रीच्या आयुष्यामध्ये बाळ हा चैतन्यदायी व अद्भुत आनंद आहे. म्हणून स्त्रीला "अल्पकाळाची पत्नी आणि अनंत काळाची माता " ही उक्ती देण्यात आलेली आहे. या मातृत्व कालावधीमध्ये स्त्रीचा आहार आणि आरोग्य उच्च प्रतीचा असणे गरजेचे आहे. कारण मातेच्या दुधाची वाढ ही मातेच्या भूक आणि आहार व त्याचा पोषण स्तर यावर अवलंबून असते.जोपर्यंत माता स्तनपान करत आहे तोपर्यंत प्रत्येक बाळास आपण सुरक्षित असल्याची भावना निर्माण होते व यामधूनच बाळ व माता यांच्या मधे भावनिक संबंध प्रस्थापित होतात. याचे प्रमुख कारण स्तनपान आहे. आईच्या उदरात आहे. उद्याचा उषःकाल हा या उक्तीप्रमाणे मानवाच्या विकासाची सुरुवात ही जन्मापासून होते. म्हणूनच बालकांचे आजारपण, आरोग्य यासाठी मातेचे दूध व स्तनपान महत्वाचे आहे. जन्मानंतर प्रत्येक मातेने अर्धा तास व दोन तासापर्यंत स्तनपान करण्याची गरज आहे. यामुळे त्या बाळाची रोगप्रतिकारशक्ती उंचावण्यासाठी मदत होऊन बाळाच्या आरोग्याविषयक गरजा पूर्ण होतात. स्तनपान या प्रक्रियेत बाधा आल्यास त्याचा थेट परिणाम बाळाच्या आरोग्यावर होतो. म्हणूनच स्त्रीच्या स्तनात दुधाची निर्मिती होत आहे व बाळ दूध पित आहे तोपर्यंत स्त्रीचे वजन वाढत नाही. स्त्रीला थकवा येत नाही. उच्चरक्तदाब, कर्करोग,मधुमेह या आजारांपासून स्तनदामातांना संरक्षण मिळते आणि जोपर्यंत स्तनपान करत आहे तो पर्यंत दुसरा गर्भ राहण्याची शक्यता असत नाही. म्हणून प्रत्येक स्तनदा मातेनी आपल्या बाळाच्या स्तनपानाचा कालावधी वाढवून त्या बाळाचे शारीरिक व मानसिक आरोग्य राखण्याची गरज आहे. शारीरिक आरोग्यामध्ये वयानुसार वजन,उंची,डोक्याचा घेर व दंड घेर तसेच मलमूत्र विसर्जन यामधील नियमितता आणि झोप यांचा समावेश होतो, तर मानसिक आरोग्यामध्ये कार्यक्षमता,गतिशीलता, भावना समजणे यांचा समावेश होतो.

स्तनपान हे केवळ बाळाचे अन्न नसून, ते आईच्या प्रेमाचे, सुरक्षिततेचे, आरोग्याचे आणि भावनिक नात्याचे अमूल्य प्रतीक आहे. बाळाच्या आयुष्याची भक्कम पायाभरणी जन्माच्या पहिल्या क्षणापासूनच आईच्या दुधातून होते. त्यामुळे प्रत्येक कुटुंब, समाज आणि आरोग्य व्यवस्था यांनी स्तनपानाला प्रोत्साहन देणे ही सामूहिक जबाबदारी आहे. विशेषतः नोकरी करणाऱ्या स्तनदा मातांना स्तनपानासाठी आवश्यक सुविधा, योग्य रजा, स्तनदूध काढून सुरक्षित साठवण्याची माहिती आणि कार्यस्थळी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक मातेला आत्मविश्वासाने आणि कोणत्याही संकोचाशिवाय आपल्या बाळाला स्तनपान देता यावे, यासाठी समाजाने सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. "जन्मानंतरच्या पहिल्या एका तासात स्तनपानाची सुरुवात, पहिले सहा महिने केवळ आईचे दूध आणि त्यानंतर पूरक आहारासोबत दोन वर्षे किंवा त्याहून अधिक काळ स्तनपान" हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचला, तर निरोगी बालक, सुदृढ माता आणि आरोग्यदायी समाज घडविण्याचे उद्दिष्ट निश्चितच साध्य होईल.

याच भावनेने जागतिक स्तनपान सप्ताह साजरा करून "स्तनपानाला प्रोत्साहन – निरोगी पिढीचे संरक्षण" हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचवू या. कारण आजची निरोगी माता आणि सशक्त बालक हेच उद्याच्या विकसित भारताचे खरे सामर्थ्य आहे.



**आईचे दूध हे सर्वोत्कृष्ट पोषणाचे स्त्रोत असल्याचे मानण्यात येते.जन्मानंतर पहिल्या अर्ध्या तासातच बाळाला दूध ओढण्याची शक्ती देऊन स्तनपान करण्याची गरज आहे. कारण स्तनपान हे सुद्धा प्रजनन क्रियेमधील एक भाग आहे. यामुळे आई व मूल यांच्यामधील नैसर्गीक नाते निर्माण होऊन आईचे दूध हे बाळासाठी निर्जंतुक आहार आहे. आईच्या दुधामधून बाळाला सर्व पोषक घटक मिळत असल्याने त्याची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.**

३
सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६
Web. http://epaper:citynewssuperfast.com

## प्रशासनाने याकडे पण लक्ष द्यावे :- सनातन संस्कृती महासंघ

**अकोला :** रस्ते अपघातांमधील मृत्यूचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी हेल्मेट सक्ती लागू करण्यात आली आहे. दुचाकी चालवणाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत आहे. रस्त्यांवरील अतिक्रमण, रस्त्यांवर पार्किंग करण्यात येत असलेली वाहनं, कर्णकर्कश हॉर्न असलेली वाहनं, फटाक्या सारखा आवाज करणाऱ्या मोटरसायकल, मोकाट फिरणारी जनावरे, खड्डे पडलेले रस्ते, रस्त्याच्या बाजूला असलेल्या उघड्या नाल्या हे प्रामुख्याने रस्ते अपघात घडण्यासाठी कारणीभूत आहेत. प्रशासनाच्या सर्व विभागांनी संयुक्तपणे कारवाई करुन या समस्या दूर केल्यास रस्त्यावर घडणाऱ्या अपघातांचे प्रमाण कमी होवू शकते. प्रशासनाने या बाबींचा गांभीर्याने विचार करुन संयुक्तपणे कारवाई करावी अशी मागणी सनातन संस्कृती महासंघातर्फे करण्यात आली असल्याचे महासंघाचे प्रसिद्धी प्रमुख विजय केंदरकर यांनी कळविले आहे.

# लोकाभिमुख प्रशासनासाठी शासनाचे सातत्यपूर्ण प्रयत्न : ॲड. आकाश फुंडकर

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला :** नागरिकांच्या अडीअडचणी वेळेत सोडविण्यासाठी प्रशासन अधिकाधिक गतिमान करण्याचा शासनाचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे. त्यादृष्टीने अनेक लोकाभिमुख उपक्रम व्यापक प्रमाणावर विविध विभागांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. महसूल विभागातर्फे आयोजित महाराजस्व अभियान नागरिकांना आवश्यक सेवा गतीने व पारदर्शक पद्धतीने मिळण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.



महसूल विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचा शुभारंभ पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते नियोजन भवन येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. आमदार रणधीर सावरकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर , उपमहापौर अमोल घोगे, मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, उपविभागीय अधिकारी डॉ.शरद जावळे, मनोज लोणारकर, तहसीलदार कुणाल झाल्टे, सुनील चव्हाण, समाज कल्याण उपायुक्त मारूती वाठ यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

शिबिराच्या माध्यमातून गरजूंना विविध योजना व सेवांचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश खासदार धोत्रे यांनी दिले. शेतकरी बांधवांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. पात्र शेतकरी बांधवांना त्याचा लाभ मिळवून द्यावा. जिल्ह्यातील अधिकाधिक् शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन आमदार श्री. सावरकर यांनी केले.

यावेळी विविध योजनेतील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात लाभ वितरण, प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन कामाला वेग देण्यासाठी आणि नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी तालुकास्तरावर महसूल विभागाकडून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानातंर्गत प्रलंबित फेरफार, सातबारा उताऱ्यातील दुरुस्ती, जात आणि रहिवासी प्रमाणपत्र, तसेच घरपट्टे वाटप अशा विविध सुविधा एकाच छताखाली पुरवण्यात येत आहेत.

# काकाजी खंडेलवाल यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी



प्रतिनिधी 2 ऑगस्ट

**अकोला :** समर्पण, जिव्हाळा, कठोर परिश्रम या त्रिसूत्रीच्या माध्यमातून स्व. काकाजी खंडेलवाल यांनी केलेले कार्य सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक प्रेरणास्रोत म्हणून प्रत्येकासाठी आदर्शवत आहे. त्यांच्या कार्यातून प्रत्येकाने प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी आज येथे केले.

ते शंकरलाल खंडेलवाल कला,विज्ञान वाणिज्य महाविद्यालयात स्व. शंकरलाल खंडेलवाल उपाख्य काकाजींची जयंती, तसेच लोकमान्य टिळक पुण्यतिथी व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त प्रेरणा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ॲड. फुंडकर बोलत होते. अध्यक्षस्थानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष ताराताई हातवळणे होत्या. आमदार वसंत खंडेलवाल,जेष्ठ प्रचारक रविंद्र भुसारी,नरकेसरी प्रकाशनचे प्रबंध संचालक धनंजय बापट, शिक्षण प्रसारण मंडळाचे उपाध्यक्ष अरुण कुलकर्णी, प्राचार्य डॉ जगदीश साबू यांच्यासह मंडळाचे सदस्य आदी उपस्थित होते.

यावेळी नरकेसरी प्रकाशन, नागपूर संस्थेला 'स्व. काकाजी स्मृती पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. तसेच प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्याचा गौरव करण्यात आला.

श्री. फुंडकर म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता सामाजिक जाणीव,अभ्यास व प्रेरणास्रोत जपणे गरजेचे आहेत. स्व. काकाजींचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. इतर मान्यवरांचीही भाषणे झाली.

# अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अडगाव बु :** छत्रपती शिवाजी नगर येथे थोर साहित्यिक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला ॲड. उमेश रहाटे, अनिल वगारे , प्रदीप क्षीरसागर, अमोल खंडारे, दीपक खंडारे, सुभाष खंडारे, संतोष पाटेकर,लाला गवई, प्रल्हाद तायडे,प्रेमनाथ वगारे,राजू खंडारे, पांडू खंडारे,अजय पाटोळे,देवानंद तायडे,दिनकर क्षीरसागर आदी उपस्थित होते.



# अल्पभूधारक शेतकरी नरेंद्र चव्हाण यांची आत्महत्या

प्रतिनिधी 2 ऑगस्ट

**आलेगाव :** गावंडगाव येथील अल्पभूधारक शेतकरी नरेंद्र मेराम चव्हाण (वय ४९ वर्षे) यांनी सततची नापिकी, शेतीतील वाढता खर्च आणि कर्जबाजारीपणाच्या विवंचनेतून शुक्रवारी (दि. १ ऑगस्ट) आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे गावंडगावसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, नरेंद्र चव्हाण यांच्या नावे चिचखेड (पिंपळखुटा) शिवारात सुमारे तीन एकर शेती असून या शेतीवरच त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून होता. तसेच मुलांच्या शिक्षणाचा खर्चही शेतीच्या उत्पन्नातून भागविला जात होता. मात्र गेल्या काही वर्षांपासून सततची नापिकी, अनियमित पाऊस, निसर्गाच्या लहरीपणामुळे होणारे पीक नुकसान आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतीतून खर्चही निघणे कठीण झाले होते. त्यामुळे त्यांच्यावर आर्थिक संकट अधिकच गडद होत गेले.

शेतीमालाला अपेक्षित भाव न मिळणे, वाढता कर्जाचा बोजा आणि सातत्याने होणारे आर्थिक नुकसान यामुळे ते मानसिक तणावाखाली असल्याचे सांगण्यात येत आहे. अखेर या परिस्थितीला कंटाळून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती आहे.

# जानामाय संस्थानवर होणार महाप्रसाद वितरण



प्रतिनिधी २ ऑगस्ट

**हिवरखेड :** येथील मेडिकल चौकात असलेल्या देवी जानामाय चॅरिटेबल संस्थेच्या वतीने पुढील रविवारी आषाढी उत्सवा निमित्ताने महाप्रसाद वितरीत करण्यात येणार आहे. भाविकांनी जानामाय दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.जानामाय संस्थान भाविकांचे श्रद्धास्थान आहे. भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. पुढच्या रविवारी महाप्रसाद वितरण करण्यात येणार आहे. त्याची तयारी सुरू केली आहे.

# मूर्तिजापुरात अनेक राजकारण्यांना लागला 'ब्रेक'; आंदोलनातून उभे राहिलेले चेहरे आता मैदानाबाहेर

प्रतिनिधी २ ऑगस्ट

मूर्तिजापूर : एकेकाळी शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि शहराच्या विविध प्रश्नांसाठी आक्रमक भूमिका घेत आंदोलनांच्या माध्यमातून आपली राजकीय ओळख निर्माण करणाऱ्या अनेक राजकारण्यांच्या राजकीय प्रवासाला आता जणू 'ब्रेक' लागल्याचे चित्र मूर्तिजापूर शहरात पाहायला मिळत आहे. काहींनी सक्रिय राजकारणापासून दूर राहणे पसंत केले असून, काहींच्या राजकीय वाटचालीला मर्यादा आल्याने शहराच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांपासून ते शहरातील मूलभूत सुविधांपर्यंत विविध समस्यांवर आंदोलन उभारून प्रशासनाचे लक्ष वेधणाऱ्या अनेक आंदोलनकर्त्यांनी एकेकाळी शहराच्या राजकारणात आपला दबदबा निर्माण केला होता. त्यांच्या आंदोलनांमुळे प्रशासनाला अनेकदा निर्णय घेण्यास भाग पाडले जात होते. मात्र, कालांतराने यातील अनेक चेहरे राजकीय पटलावरून गायब झाल्याचे दिसून येत आहे.

काही राजकीय कार्यकर्त्यांनी सक्रिय राजकारणाला जवळपास पूर्णविराम दिला आहे, तर काहींनी राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी पक्षबदलाचा मार्ग स्वीकारल्याची चर्चा शहरात सुरू आहे. वैयक्तिक राजकीय भवितव्य आणि स्वार्थासाठी भूमिका बदलणाऱ्या नेत्यांबाबतही नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा रंगत आहे.

एकेकाळी शहराच्या राजकारणात ज्यांचा मोठा वचक होता, तेच चेहरे आता राजकीय मैदानापासून दूर असल्याने त्यांच्या अनुपस्थितीची चर्चा होत आहे. दरम्यान, नव्या पिढीतील काही हौशी कार्यकर्ते राजकारणात सक्रिय होण्याचा प्रयत्न करीत असले तरी, त्यांच्याकडे ठोस जनआंदोलन उभारण्याची क्षमता आणि सातत्यपूर्ण जनसंपर्क कितपत आहे, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

मूर्तिजापूरच्या राजकारणात सध्या विरोधकांची भूमिका प्रभावीपणे मांडणारे आक्रमक चेहरे कमी झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे आगामी काळात शहरातील राजकीय समीकरणे कोणत्या दिशेने वळतात आणि नव्या नेतृत्वाचा उदय होतो का, याची उत्सुकता नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

# कर्जमाफीच्या मागणीसाठी शेतकऱ्यांचे सहकार मंत्र्यांना निवेदन

## दखल न घेतल्याचा आरोप

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला :** जिल्ह्यातील वाडेगाव, नकाशी, चिंचोली आणि बटवाडी येथील पुनर्गठित कर्जधारक शेतकऱ्यांनी आज शासकीय विश्रामगृहात सहकार मंत्र्यांची भेट घेऊन कर्जमाफीसाठी निवेदन दिले. २०१७-१८ मध्ये परवानगी व संमती न घेता पीककर्जाचे पुनर्गठन केल्यामुळे २०१९ च्या महात्मा फुले कर्जमाफी योजनेसह २०२६ च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेपासून वंचित राहिल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. शासनाने तातडीने कर्जमाफीचा लाभ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

मात्र सहकार मंत्र्यांनी केवळ निवेदन स्वीकारले, शेतकऱ्यांशी संवादही साधला नाही, असा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि या भूमिकेचा निषेध नोंदवला.

# म्हैसांग येथे कथित गंजी पत्त्याचा अड्डा; कारवाईच्या प्रतीक्षेत नागरिक

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला** :अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू पोलीस स्टेशन हद्दीतील म्हैसाग गावात स्मशानभूमीसमोरील एका खाजगी जागेत कथितरित्या गंजी पत्त्याचा जुगार सुरू असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात जुगारी जमा होत असल्याची चर्चा परिसरात असून, त्यामुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



स्थानिकांच्या माहितीनुसार, या कथित जुगार अड्डयावर दिवसेंदिवस वर्दळ वाढत असून परिसरातील तरुण वर्गावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. गावातील शांतता आणि सामाजिक वातावरण बिघडत असल्याने संबंधित ठिकाणी तातडीने छापा टाकून सत्य परिस्थितीची पडताळणी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

नागरिकांनी बोरगाव मंजू पोलीस प्रशासनाकडे या कथित प्रकाराची सखोल चौकशी करून, जुगार सुरू असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# प्रभात किड्सच्या चिमुकल्यांचे लोकमान्य टिळकांना अभिवादन




प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला :** थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त स्थानिक प्रभात किड्स च्या नर्सरी वर्गातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी टिळकांची वेशभूषा करून त्यांना अभिवादन केले.

या अभिवादन कार्यक्रमानिमित्त आज सकाळी या चिमुकल्या बालकांनी लोकमान्य टिळकांची सुंदर वेशभूषा करून शाळेत प्रवेश केला. याप्रसंगी या बालकांनी लोकमान्य टिळकांनी त्यांच्या जीवनात केलेल्या घोषणा म्हणून दाखविल्या. " स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळविणारच " हे घोषवाक्य अधिराज अक्षय खाडे या बालकाने सुंदर अविर्भावात सादर केले. इतर विद्यार्थ्यांनीही काही घोषवाक्य म्हणून दाखविली.

विद्यार्थ्यांना बाल वयातच थोर राष्ट्रपुरुषांची ओळख व्हावी या उद्देशाने सदर वेशभूषेचा उपक्रम प्रभात किड्स चे संचालक डॉ. गजानन नारे व शिक्षकांनी सुरू केला आहे. या उपक्रमास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून पालकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

# युवा नाथ संघटना तर्फे गुरुपूजन उत्सव साजरा

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला** :युवा नाथ संघटना महाराष्ट्र राज्यच्या वतीने गुरुपूजन उत्सव साजरा झाला. सुरुवातीला जगद्गुरू श्री गोरक्षनाथ महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन व महाआरतीने करण्यात आली. यानंतर उपस्थितांनी गुरुंच्या चरणी पुष्प अर्पण करून आशीर्वाद घेतले.

यावेळी सुधाकरनाथ पाठक, कैलासनाथ इंगळे, अशोकनाथ कापसे, सुरेंद्रनाथ इंगळे, सुरजनाथ इंगळे, युवा नाथ संघटना महाराष्ट्र राज्यचे संस्थापक अध्यक्ष राहुल इंगळे, प्रदेश उपाध्यक्ष गजानननाथ इंगळे, प्रदेश सचिव गणेशनाथ चिलीवंत, (महिला) प्रदेश उपाध्यक्ष सौ. वैशाली इंगळे, अकोला महानगर सहसचिव सौ. मीराताई पाठक यांच्यासह कमलाबाई पाठक, सौ. उषा इंगळे, संगीता पाठक, रेखा इंगळे, सौ. पल्लवी इंगळे, सिद्धी पाठक, अक्षय पाठक, चिराग इंगळे व वैष्णव सातपुते उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर महाआरती झाली. गुरुपूजन उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता "गुरु गोरक्षनाथ महाराज की जय"च्या जयघोषात झाली.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## एक्साईजला टीप दिल्याच्या संशयातून युवकाचे अपहरण

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**कळंब** : उत्पादन शुल्क विभागाला टीप दिल्याच्या संशयातून दोघांनी एका युवकाचे अपहरण करत त्याला हिंगणघाट येथे लॉजच्या रूममध्ये डांबून बेदम मारहाण केली. ही घटना २८ ते २९ जुलैदरम्यान घडली. पोलिसांत तक्रार दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी कळंब पोलिसांनी गुरूवारी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

धोत्रा येथील पेट्रोलपंपाजवळून अनिकेत पंजाबराव येसनसुरे (रा. राळेगाव) या युवकाचे संगत गुरुमुख सिंग, समीर अफरोज अली सय्यद दोघे रा. हिंगणघाट यांनी अपहरण केले. त्याला एमएच २१ बीएफ ३६६९ क्रमांकाच्या कारमध्ये डांबून पोहणा, वडकी, पांढरकवडा येथून हिंगणघाट येथे नेले. तेथे दोन दिवस लॉजच्या रूममध्ये डांबून ठेवत बेदम मारहाण केली. सुटका झाल्यानंतर अनिकेत याने कळंब पोलिस ठाणे गाठून तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी दोघांवर विविध कलमनुसार गुन्हा दाखल केला. या घटनेमुळे खळबळ उडाली. कळंब ठाणेदार यांच्या मार्गदर्शनात पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# मुकुटबन ग्रामपंचायतीतील आर्थिक व्यवहारांवर संशय; चौकशीची मागणी

प्रतिनिधी २ ऑगस्ट




**झरी** : ग्रामपंचायत मुकुटबन येथील प्रशासकीय कारभारात नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत माजी ग्रामपंचायत सदस्य तथा ग्रामपंचायत प्रशासकीय समितीचे सदस्य प्रशांत करमचंद बघेले यांनी पंचायत समिती झरी-जामणीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

निवेदनानुसार, ग्रामपंचायतीच्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपल्यानंतर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. मात्र, नियमानुसार प्रशासकीय समितीच्या नियमित सभा घेणे आवश्यक असतानाही आजपर्यंत एकही सभा घेण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे निर्णय प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याचे बघेले यांनी म्हटले आहे.

याशिवाय, प्रशासक व ग्रामसेवक यांनी प्रशासकीय समितीची मंजुरी न घेता सामान्य निधी, पाणीपुरवठा निधी तसेच विविध शासकीय योजनांतील निधीची मोठ्या प्रमाणावर उचल केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या व्यवहारांची तपासणी करून निधीचा वापर नियमानुसार झाला का, याची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या प्रशासक व ग्रामसेवकांवर प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रशांत बघेले यांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित प्रशासक किंवा ग्रामसेवक यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप प्राप्त झालेली नाही. त्यामुळे चौकशीनंतरच आरोपांची सत्यता स्पष्ट होणार असून, या प्रकरणाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## पुसदमध्ये व्यवसाय शिक्षणाचे नवे पर्व; पहिली 'मल्टी सेक्टर लॅब' विद्यार्थ्यांसाठी खुली

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**पुसद** : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने पुसद तालुक्यातील पहिली व्यवसाय शिक्षण प्रयोगशाळा (मल्टी सेक्टर लॅब) गुणवंतराव देशमुख माध्यमिक विद्यालयात सुरू करण्यात आली आहे. शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि Lend A Hand India (LAHI), पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला असून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून विविध व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

प्रयोगशाळेचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी धीरज आडे आणि गुणवंतराव उपाख्य अण्णासाहेब चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. आशिष देशमुख यांच्या हस्ते झाले. या प्रयोगशाळेत आरोग्यसेवा, बागकाम, पाककला, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), मेकॅट्रॉनिक्स आणि संरक्षित कृषी तंत्रज्ञानाशी संबंधित अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कृतीआधारित शिक्षण, प्रकल्पनिर्मिती, क्षेत्रभेटी, औद्योगिक भेटी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि कौशल्यविकास कार्यशाळांचा लाभ मिळणार आहे. इयत्ता सहावीपासून व्यवसायाभिमुख शिक्षण मुख्य प्रवाहात आणण्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दिष्टाला या प्रयोगशाळेमुळे प्रत्यक्ष बळ मिळणार असल्याचे मानले जात आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टचे सचिव प्रा. विजयराव देशमुख होते. शिक्षण विस्तार अधिकारी उमेश वाघमारे, शीतलकुमार वानखेडे, केंद्रप्रमुख संघपाल आडोळे, एलएएचआयचे मार्गदर्शक मिलिंद भैसारे, शाळा समिती सदस्य अजय खैरे, साधन व्यक्ती रामभाऊ रोगे, पर्यवेक्षक दिलीप राठोड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

ॲड. आशिष देशमुख यांनी पुसद तालुक्यातील पहिली व्यवसाय शिक्षण प्रयोगशाळा आपल्या विद्यालयात सुरू होणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित शिक्षणाचे नवे दालन खुले झाल्याचे नमूद केले. अध्यक्षीय समारोपात प्रा. विजयराव देशमुख यांनी शासनाच्या विद्यार्थीहिताच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांपर्यंत त्याचा अधिकाधिक लाभ पोहोचविण्यासाठी संस्था सातत्याने पुढाकार घेईल, अशी ग्वाही दिली. अजय खैरे यांनीही कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

## 'नैसर्गिक संपत्तीवर आदिवासींचा पहिला हक्क'

### पालकमंत्री संजय राठोड यांची ग्वाही



प्रतिनिधी २ ऑगस्ट

**यवतमाळ** : आदिवासी समाजाच्या नैसर्गिक संसाधनांवरील हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, नैसर्गिक संपत्तीवर आदिवासी बांधवांचाच पहिला हक्क आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले. क्रांतिवीर शामादादा कोलाम यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त कळंब तालुक्यातील दत्तापूर (निरंजन माहूर) येथे आयोजित आदिवासी संस्कृती जतन-संवर्धन व भव्य लाभार्थी मेळाव्यात ते बोलत होते.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा आणि क्रांतिवीर शामादादा कोलाम संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या कार्यक्रमाला आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, खासदार संजय देशमुख, प्रकल्प अधिकारी रेवैयाह डोंगरे, अमोल मेतकर तसेच विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात आदिवासी समाजाच्या पारंपरिक जीवनशैलीचा परिचय करून देण्यासाठी रानभाजी महोत्सव भरविण्यात आला. विविध शासकीय योजनांची माहिती देत महिला सक्षमीकरण, कृषीपूरक व्यवसाय, हॉटेल-ढाबा व लघुउद्योगांसाठी मंजूर कर्जाचे धनादेश लाभार्थ्यांना वितरित करण्यात आले. तसेच गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा गौरवचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री संजय राठोड आणि आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते क्रांतिवीर शामादादा कोलाम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंजूर १ कोटींच्या सांस्कृतिक भवनाचे भूमिपूजन करण्यात आले. या भवनातून आदिवासी संस्कृतीचे जतन, सामाजिक उपक्रमांना चालना आणि भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी केंद्र उभे राहील, असा विश्वास प्रा. डॉ. उईके यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतिवीर शामादादा कोलाम यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले. आदिवासी संस्कृती, स्वाभिमान आणि विकासाचा संगम ठरलेल्या या मेळाव्याला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## 'गुणांचा गौरव, पालकांचा मान' : ५७१ विद्यार्थ्यांचा सन्मान

### पाच तास उभे राहून पालकमंत्र्यांनी जपली परंपरा



प्रतिनिधी २ ऑगस्ट

**दिग्रस** : शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देतानाच विद्यार्थ्यांच्या यशामागील पालकांच्या योगदानालाही तितकाच सन्मान देणारा अनोखा सोहळा दिग्रसमध्ये पार पडला. दहावी व बारावी परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या तालुक्यातील ५७१ गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींसह त्यांच्या पालकांचा पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते भव्य सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे, प्रत्येक विद्यार्थ्याचा वैयक्तिक सन्मान व्हावा यासाठी पालकमंत्र्यांनी तब्बल पाच तास व्यासपीठावर उभे राहून सत्काराची परंपरा कायम ठेवली.

राजेश्वर मंगल कार्यालयात झालेल्या या सोहळ्याचे आयोजन शिवसेना, युवासेना, विद्यार्थीसेना आणि महिला आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, स्कूल बॅग, फाईल आणि उपयुक्त भेटवस्तू देण्यात आल्या, तर त्यांच्या पालकांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गुणवंत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे फेटे बांधून स्वागत करण्यात आले. गायक श्रीकांत टकले यांनी सादर केलेल्या प्रेरणादायी गीताने कार्यक्रमाला भावनिक रंग चढला.

सत्कारादरम्यान संजय राठोड यांनी प्रत्येक विद्यार्थ्याशी संवाद साधत त्यांचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचे कष्ट आणि त्याग महत्त्वाचा असल्याचे सांगत त्यांच्या सन्मानालाही तितकेच महत्त्व दिले. कार्यक्रमाला शिवसेना पश्चिम विदर्भ संपर्कप्रमुख पराग पिंगळे, सहसंपर्कप्रमुख श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख यशवंत पवार, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वैशाली मासाळ, बाळासाहेब दौलतकर, सुधीर देशमुख, राजकुमार वानखडे, उत्तम ठवकर, डॉ. संदीप दुधे, मिलिंद मानकर, नगर परिषदेचे पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामदास पद्मावार यांनी केले. सूत्रसंचालन पत्रकार सुरेंद्र मिश्रा, अमीन चव्हाण आणि संदीप रत्नपारखी यांनी केले.

### मोबाईलचा वापर मर्यादित ठेवा : संजय राठोड

■ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संजय राठोड यांनी स्पर्धा परीक्षांसाठी डिजिटल अभ्यासिका, मोफत संदर्भग्रंथ आणि शिष्यवृत्ती योजनांची माहिती दिली. "मोबाईलचा वापर केवळ आवश्यक आणि विधायक कामांसाठी करा. मोबाईलच्या व्यसनातून मुक्त झाल्याशिवाय मोठे यश मिळणे कठीण आहे," असा संदेश त्यांनी दिला. "तुम्ही मला भाऊ म्हणून हाक द्या, मी नक्कीच 'ओ' देईन," असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांशी भावनिक संवाद साधला.

### 'पतंगाचा धागा म्हणजे आई-वडील'

■ करिअर मार्गदर्शक युवराज मेहेत्रे यांनी विद्यार्थ्यांना आवडीच्या क्षेत्रात करिअर घडविण्याचे आवाहन केले. "पतंग कितीही उंच भरारी घेत असला, तरी त्याचा धागा तुटता कामा नये; तो धागा म्हणजे आई-वडील," या त्यांच्या संदेशाला उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## सहस्त्रकुंड धबधबा : पैनगंगेच्या कुशीत खुलला निसर्गोत्सव

### ३० ते ४० फुटांवरून कोसळणाऱ्या धबधब्याने वेधले पर्यटकांचे लक्ष

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**यवतमाळ** : गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे पैनगंगा नदी दुथडी भरून वाहत असून, उमरखेड तालुक्यातील विदर्भातील प्रसिद्ध सहस्त्रकुंड धबधबा पुन्हा प्रवाहित झाला आहे. सुमारे ३० ते ४० फुटांवरून फेसाळत कोसळणाऱ्या जलधारांनी संपूर्ण परिसर निसर्गसौंदर्याने न्हाऊन निघाला असून, पर्यटकांची पावले आता सहस्त्रकुंडकडे वळू लागली आहेत.

पावसाळा सुरू होताच पर्यटकांना भुरळ घालणाऱ्या या धबधब्याने यंदाही आपले रौद्र आणि मोहक रूप धारण केले आहे. डोंगररांगांवरील गर्द हिरवाई, खळाळत कोसळणाऱ्या शुभ्र जलधारा, उडणारे तुषार आणि पाण्याच्या प्रवाहाचा गडगडाट यामुळे सहस्त्रकुंड परिसरात निसर्गाचा अनोखा जल्लोष अनुभवायला मिळत आहे.

#### सौंदर्य डोळ्यांत साठवा; पण सुरक्षिततेची सीमा ओलांडू नका!

■ सहस्त्रकुंडचा निसर्गरम्य नजारा मनमोहक असला तरी पावसाळ्यात येथे विशेष खबरदारी आवश्यक आहे. प्रशासनाच्या सूचनांचे पालन करूनच या अद्भुत निसर्गसौंदर्याचा आनंद घ्यावा.



सहस्त्रकुंड धबधबा विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवर असून, याचा एक भाग उमरखेड तालुक्यात तर दुसरा भाग नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात येतो. उमरखेडपासून सुमारे ७० किलोमीटर आणि यवतमाळपासून सुमारे १८१ किलोमीटर अंतरावर असलेले हे पर्यटनस्थळ पावसाळ्यात विशेष आकर्षण ठरते.

गेल्या काही दिवसांतील दमदार पावसामुळे पैनगंगेच्या पाण्याच्या पातळीत मोठी वाढ झाली असून, त्यामुळे सहस्त्रकुंडचा प्रवाह अधिक वेगाने सुरू झाला आहे. धबधब्याचे मनोहारी दृश्य पाहण्यासाठी आणि छायाचित्रणासाठी पर्यटकांची गर्दी वाढत आहे.

मात्र, धबधब्याचे सौंदर्य अनुभवताना सुरक्षिततेची काळजी घेणेही तितकेच आवश्यक आहे. पाण्याच्या वेगवान प्रवाहाजवळ जाणे, कड्यावर उभे राहून सेल्फी काढणे किंवा नदीपात्रात उतरणे टाळावे, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. पैनगंगा नदीच्या पाण्याच्या प्रवाहात अचानक वाढ होण्याची शक्यता असल्याने पर्यटकांनी सतर्क राहून सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करावे.

## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश

प्रतिनिधी २ ऑगस्ट




**उमरखेड** : लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त औदुंबर वृक्ष संवर्धन समितीच्या वतीने राजाराम प्रभाजी उत्तरवार उपजिल्हा रुग्णालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

"पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर नव्हे, तर कष्टकरी व श्रमिकांच्या हातावर तरली आहे," असा विचार मांडणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीला अभिवादन करत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी माजी आमदार नामदेव ससाने, शेवंतराव गायकवाड, दामोदर इंगोले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष कपिल खंदारे, लहुजी सेनेचे तालुकाध्यक्ष जयकुमार बनसोड, औदुंबर वृक्ष संवर्धन समितीचे ज्येष्ठ सदस्य भारत कुलकर्णी, दीपक ठाकरे, वैभव कोडगिरवार, धनंजय भागवत, प्रकाश शेळके, वीरेंद्र खंदारे, दिलीप भंडारे तसेच समितीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड आणि त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. वृक्ष लावण्याबरोबरच ते जगविण्याची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे, असा संदेश देण्यात आला.

या उपक्रमाला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीने वृक्षसंवर्धनासाठी ५०० रुपयांचा वृक्षनिधी प्रदान केला. या सहकार्याबद्दल औदुंबर वृक्ष संवर्धन समितीने समितीचे आभार मानले. कार्यक्रमातून पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकीचा प्रभावी संदेश देण्यात आला.

## शेंबाळपिंपरीत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्साहात

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**शेंबाळपिंपरी** : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शेंबाळपिंपरी येथील अण्णा भाऊ साठे नगरात मातंग समाजाच्या वतीने शनिवारी (दि. १) उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. राहुल शिरसाट यांच्या निवासस्थानालगत झालेल्या या कार्यक्रमात समाजप्रबोधन, शिक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुलाबराव वाहुळे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस अधिकारी नारायण पवार उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुलभाई सिद्दीकी, बापुराव कांबळे, उस्मान डोंगे, रवि शिरसाट, सुनील वाहुळे आणि सुनीता कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते लोकशाहीर अण्णा भाऊ साठे तसेच अन्य महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जैनुलभाई सिद्दीकी यांनी मनोगत व्यक्त करताना मातंग समाजातील पालकांनी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत मुलांच्या उच्च शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. इतर मान्यवरांनीही समाजातील एकता, शिक्षण आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याचे आवाहन केले.

अध्यक्षीय समारोपात गुलाबराव वाहुळे यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संघटित प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विशाल कांबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शुभांगी मोगले यांनी मानले.

कार्यक्रमाला मातंग समाजातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसह विविध समाजघटकांतील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी फकीरा रणखांब, शंकर रणखांब, बाळासाहेब ससाणे, संतोष रणखांब, नागोराव रणखांब, संतोष ससाणे आणि अन्य तरुणांनी विशेष परिश्रम घेतले.

## शेतीला उद्योगाचा दर्जा द्या; अन्यथा अन्नदात्याचे अस्तित्व धोक्यात

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**यवतमाळ** : शाश्वत कृषी धोरण, हमीभाव आणि सिंचनावर भर देण्याची स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते मिनीष जाधव यांची मागणी

यवतमाळ, २ ऑगस्ट : बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च, अपुरा बाजारभाव आणि शेतकरीविरोधी धोरणांमुळे राज्यातील शेती अभूतपूर्व संकटातून जात असून, कृषी क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देत स्वतंत्र कृषी अर्थसंकल्प सादर करण्याची वेळ आली आहे, असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शेतकरी नेते मनीष जाधव यांनी व्यक्त केले आहे.

प्रसिद्धीपत्रकाद्वारे त्यांनी सांगितले की, देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या कृषी क्षेत्राला आजही अपेक्षित संरक्षण मिळत नाही. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, गारपीट, दुष्काळ, वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव आणि हवामान बदलामुळे उत्पादनात मोठी अनिश्चितता निर्माण झाली आहे. दुसरीकडे बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीचा वाढलेला खर्च शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढवत आहे. स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशीनुसार उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा जोडून हमीभाव देण्याची अंमलबजावणी करावी, तसेच नाफेड आणि सीसीआयसारख्या यंत्रणांनी शेतकऱ्यांच्या शेवटच्या दाण्यापर्यंत खरेदी करण्याची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी त्यांनी केली.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या पीक नुकसानीचा समावेश करावा, बोगस बियाणे, खते व कीटकनाशकांच्या फसवणुकीच्या प्रकरणांत शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी स्वतंत्र कृषी न्याय प्राधिकरण स्थापन करावे, अशीही त्यांनी मागणी केली.

# संवेदनशीलता, शिस्तीतून लोकाभिमुख प्रशासन घडवा

## विभागीय आयुक्त नयना गुंडे; अमरावती विभागात 'महसूल दिन' उत्साहात साजरा

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**अमरावती :** महसूल विभाग हा संपूर्ण शासनाचा कणा आणि मुख्य चेहरा आहे. सामान्य जनता शासनाचे प्रतिनिधी म्हणून महसूल प्रशासनाकडे पाहते. त्यामुळे या विभागातील प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या वर्तनात शिस्त, संवेदनशीलता आणि सहानुभूती आणून लोकाभिमूख प्रशासन घडवावे, असे विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी आज येथे सांगितले.

1 ऑगस्ट 'महसूल दिना' निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी से.नि. अपर आयुक्त सुरज वाघमारे, अपर आयुक्त संजय जाधव, अपर जिल्हाधिकारी गोविंद दाणेज, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह विभागातील पुरस्कारार्थी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी विभागातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे म्हणाल्या की, महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा आहे. शेतकरी, शेतमजूर आणि सामान्य नागरिकांचा थेट संपर्क या विभागाशी येतो. 1 ते 7 ऑगस्ट दरम्यान साजऱ्या होणाऱ्या महसूल सप्ताहाच्या माध्यमातून शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत जलदगतीने पोहोचवावा. महसूल विभागात होत असलेले नवनवीन तंत्रज्ञान आणि डिजिटल बदल अधिकारी-कर्मचाऱ्यांनी वेगाने स्वीकारून अधिक पारदर्शक व लोकाभिमुख काम करावे. डिजिटल सेवांचा प्रभावी वापर करून नागरिकांना सुलभ व पारदर्शक सेवा देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. महसूल विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजना व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी. या योजनांच्या फलश्रुतीची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी व्यापक जनजागृती व प्रसिद्धी द्यावी.

त्या पुढे म्हणाल्या की, सध्या 'एल निनो'च्या परिणामांमुळे अत्यंत कमी दिवसांत अधिक पाऊस पडण्याचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर अमरावती विभागात उद्भवलेल्या पूरपरिस्थितीवर मात करण्यासाठी येथील आपत्ती व्यवस्थापन केंद्र आणि बचाव पथकांनी अत्यंत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

आपत्तीच्या काळात जिवाची पर्वा न करता नागरिकांचे प्राण वाचवणाऱ्या कर्मचाऱ्यांचे त्यांनी विशेष कौतुक केले.

# अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्यावर धडक कार्यवाही

## दहा लाखाचा गांजा अंमली पदार्थ जप्त

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**अमरावती:** अंमली पदार्थाची वाहतुक करणा-यावर धडक कार्यवाही करून -दहा लाखाचा गांजा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी ऑपरेशन कवच या संकल्पनेखाली अंमली पदार्थाचा समुळ उच्चाटन करण्याचे आदेश सर्व अमरावती ग्रामीण घटकातील सर्व पोलीस स्टेशन प्रभारी तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांना दिले आहे.

त्याअनुषंगाने अमरावती ग्रामीण हद्दीत पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांनी सर्व पथकांना कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या होत्या त्यावरुन पो.उप.नि. रोहीत कुदळे, स्था.गु.शा. अमरावती ग्रामीण व पथक हे कारवाई कामी पोलीस स्टेशन लोणी टाकळी, हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहीती मीळाली की, एक पुरुष व एक महिला गांजा हा अंमली पदार्थ घेऊन बडनेरा ते लोणी रोड लगत असणा-या श्री.संत सखाराम महाराज देवस्थान बोर्ड जवळ येणार आहे, अशा खबरेवरुन पंच पो. स्टॉप, इलेक्ट्रीक वजन मापारी, फॉरेन्सीक टिम सह सदर बातमीची खात्री करण्याकरीता पथक पोहचले असता त्या ठिकाणी खबरेप्रमाणे एक महिला व एक पुरुष पांढ-या रंगाच्या मळकट नायलॉन गोणीसह उभे असलेले दिसून आले. त्यांना पथकाचा परिचय देऊन त्यांचे नाव, गाव विचारले असता सुधिर बुधाजी फुलमाळी वय ३६ वर्ष रा. आनंद नगर, वर्धा व महिला हिने तिचे नाव कांता रणजीत लोंगबरसे वय २८ वर्ष रा. पुलफैल, वर्धा असे सांगितले. त्यांचे ताब्यातील गोणीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामध्ये अंमली पदार्थ गांजा हा दिसून आला त्याचे उपस्थित वजन काटयावर मापारी यांनी निवळ गांजाचे वजन केले असता २०.८६९ कि.ग्रॅम गांजा किंमत १०,४३,४५०/-रु. चा मिळून आला. पंचासमक्ष सदर माल जप्त करण्यात आला. सदर आरोपीतांविरुध्द पोलीस स्टेशन लोणी येथे नमुद आरोपीविरुध्द कायदेशीर फिर्याद देऊन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. निकेतन कदम, पोलीस अधीक्षक यांनी राबविलेल्या 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अंमली पदार्थाच्या गैरवापर व अवैद्य तस्करीविरुध्द शुन्य सहनशिलता धोरण स्विकारण्यात आले असून अंमली पदार्थ उत्पादन, विक्री, साठवणूक, वाहतुक, सेवन, याचे विरुध्द कठोर कारवाई बरोबरच प्रतिबंधात्मक व जनजागृतीपर उपायोजनांवर विशेष भर देण्यात येत आहे.

# महावितरणच्या हलगर्जीपणामुळे कर्मचाऱ्याचा मृत्यू

## खासदार बळवंत वानखडे यांच्या मध्यस्थीनंतरच मृतदेह ताब्यात घेण्यास कुटुंबियांची सहमती





अमरावती जिल्ह्यातील नांदगाव एमआयडीसी परिसरात एमएसव्ही कॉन्ट्रॅक्टच्या माध्यमातून झाडे तोडण्याचे काम सुरू होते.

कामादरम्यान खालची वीज लाइन बंद करण्यात आली होती. मात्र वरची वीज लाइन सुरूच होती. झाड तोडताना त्या झाडाची एक फांदी वरच्या सुरू असलेल्या वीज लाईनला स्पर्श झाली. त्यामुळे विजेचा जोरदार धक्का बसून संबंधित कामगाराचा जागीच मृत्यू झाला.

मागण्या मान्य होईपर्यंत शव विच्छेदन केंद्रात, पीएम करण्यास नातेवाईकांनी नकार दिला. त्यामुळे इरवीन रुग्णालयाच्या बाहेर गर्दी झाली होती. पोलिसांचाही बंदोबस्त होता.

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अमरावती :** नांदगाव पेठ अमरावती येथे रोहन विठ्ठल राठोड हे महाराष्ट्र विद्युत वितरण विभागात कामानिमित्त विद्युत पोलवर चढले असता संबंधित कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे ( रोहन विठ्ठल राठोड ) यांना विद्युत प्रवाहामुळे जोरदार झटका लागून त्यांचा जागेची मृत्यू झाला. त्यांचे पार्थिव इर्विन रुग्णालय अमरावती येथे आणले असता मृतक कुटुंबातील सदस्यांचा व महावितरण मधील अधिकाऱ्यांच्या मध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला.

यावेळी खासदार बळवंत वानखडे यांनी कुटुंबातील सदस्यांसोबत व महावितरणाच्या अधिकाऱ्यांसोबत मध्यस्थी करत मृतकाच्या परिजनांना योग्य मोबदला व शासकीय सहाय्यता उपलब्ध करून देण्याचे लिखित दिल्यावरच पोस्ट मार्टम करण्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांना निर्देश दिले. यावेळी दिपक जवंजाळ व शेकडोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# जबरी चोरीचे आरोपी निष्पन्न; मुद्देमालासह गुन्हे शाखाने घेतले ताब्यात

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**अमरावती:** जबरी चोरीचे आरोपी निष्पन्न करुन मुद्देमालासह गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी आरोपीना ताब्यात घेतले आहे.

९ जुलै रोजी पो.स्टे. नांदगांवपेठ येथे फिर्यादी तुषार ज्ञानेश्वर रावतळे, वय २२ वर्षे, रा. छत्रसाल नगर, अमरावती यांनी जबरी चोरीबाबत तक्रार दिली की, ते त्यांची मैत्रीण असे दोघे पोटे कॉलेज रोड, लुंगे लॉन चे समोरिल परिसरात असता एका काळया रंगाच्या दुचाकीवर तीन अज्ञात इसम आले त्यांनी फिर्यादी व त्यांच्या मैत्रीणला दमदाटी करुन त्यांचे जवळील एक Vivo कंपनीचा मोबाईल व एक Realme कंपनीचा मोबाईल तसेच नगदी ५५० असा एकूण १२,५५०/-रु. चा मुद्देमाल जबरीने हिसकावून घेतला. नंतर तीघे अज्ञात ईसम त्यांचे वाहनासह तेथून पळून गेले. अशा फिर्यादी वरुन पो.स्टे. नांदगांवपेठ येथे अपराध क्रमांक २४६/२०२६ कलम ३०४(२), ३(५) भा. न्या. सं. प्रमाणे गुन्हा नोंद होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, अमरावती शहर करीत असतांना दिनांक ३१ जुलै रोजी दोन ईसम हे ईतवारा बाजार, अमरावती येथे एक मोबाईल विक्रीच्या प्रयत्नात आहे. अशा खात्रीशीर माहिती वरुन गुन्हे शाखा, अमरावती ईतवारा बाजार, अमरावती येथे जावून मोबाईल विक्रीच्या प्रयत्नात असलेल्या दोन्ही ईसमांना ताब्यात घेवून मोबाईल बाबत बारकाईने विचारपूस केली असता त्यांनी सांगीतले की, दिनांक ९ जुलै रोजी आम्ही दोघे तसेच आमचा आणखी एक मित्र असे तिघेजण पल्सर गाडीसह पोटे कॉलेज रोडवर असलेल्या लुंगे लॉनचे समोरिल परिसरात गेलो असता एक मुलगा व मुलगी यांचे जवळून काही नगदी व दोन मोबाईल जबरीने हिसकावले होते त्यातील एक मोबाईल आम्ही विक्री करीता आणला होता. अशा प्रकारे आरोपीतांनी गुन्हयाची कबूली दिल्याने दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या जवळून आणखी दोन मोबाईल मिळून आले. अशा प्रकारे सदरचा गुन्हा उघडकीस आणला.

जबरी चोरी चे गुन्हयातील आरोपीं चे नाव -शाहरुख खान आमीर खान, वय २२ वर्षे, रा. लालखडी, फातीमानगर, अमरावती,अलतमश खान सलीम खान, वय २५ वर्षे, रा. शरीफा मस्जीद जवळ, अलकरीम नगर कं. ०४, अमरावती, गोलू रा. फातीमा नगर, अमरावती (फरार) आहे. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल - Vivo कंपनीचे २ मोबाईल मोबाईल तसेच Realme कंपनीचा १ मोबाईल किं. अं.२१,०००/-रु.,गुन्हयात वापरलेली काळया रंगाची पल्सर गाडी कं. MH 27-EA 4149 किं. अं.७०,०००/-रु. असा एकूण ९१,०००/-रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# विभागीय आयुक्तालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**अमरावती :** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आज विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे यांच्यासह विभागीय आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# बडनेरा मतदारसंघात 47,890 'असंग्रहित' मतदारांची नोंद

## नाव वगळण्यापूर्वी पडताळणी करण्याचे निवडणूक विभागाचे आवाहन

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अमरावती:** भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार 37 बडनेरा विधानसभा मतदारसंघांतर्गत विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम 2026 राबविला जात आहे. या मोहिमेत आजअखेर 47,890 असंग्रहित मतदार आढळले आहेत. त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात येणार आहेत. त्यामुळे पात्र मतदारांनी बीएलओकडे जाऊन तातडीने पडताळणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

या मोहिमेत घरोगरी सर्वेक्षण कालावधी हा 30 जून ते 8 ऑगस्ट 2026 असून यात गणना प्रपत्र वाटप करणे आणि गोळा करून डिजिटाईस करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. त्यानंतर प्रारूप मतदारयादी 17 ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. यात बडनेरा विधानसभा मतदारसंघातील 345 ग्रामीण व शहरी भाग समाविष्ट आहे. 'असंग्रहित' मतदारांमध्ये मयत मतदार, कायमस्वरूपी स्थलांतरित झालेले नागरिक, अनुपस्थित मतदार आणि दुबार नोंदणी असलेले मतदार यांचा समावेश आहे. एसआयआरमधील असंग्रहित मतदारांची माहिती देण्यासाठी आज 31 जुलै रोजी शाम चौक येथील निवडणूक कार्यालयात राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत असंग्रहित मतदारांच्या आकडेवारीबाबत माहिती देऊन त्यांना मतदारयादीतून वगळण्याच्या प्रक्रियेबाबत सूचना देण्यात आली. मतदारयादीतील नावाबाबत आपल्या परिसरातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधून असंग्रहित दर्शविलेल्या नावाची पडताळणी करून घ्यावी. जर पात्र मतदार चुकीने 'असंग्रहित' म्हणून दर्शविला गेला असेल, तर त्याचे नाव तात्काळ निवडणूक विभागात किंवा संबंधित बीएलओकडे कळवावे. जेणेकरून कोणताही पात्र मतदार वगळल्या जाणार नाही.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**अमरावती :** लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, अधिक्षक निलेश खटके यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. उपस्थितांनीही लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले.

# दहशत माजविणारे तडीपार इसमाविरुध्द राजापेठ पोलीसांची कार्यवाही



प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अमरावती:** हातात घातक हत्यार घेवुन दहशत माजविणारे तडीपार इसमाविरुध्द राजापेठ पोलीसांनी कार्यवाही केली आहे.

दि. ३१ जुलै रोजी दुपारी अंदाजे २ वाजता पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर येथील डी बी पथक पोलीस स्टेशन हददीत पेट्रोलींग करीत असताना मिळालेल्या माहितीचे आधारे पोलीस आयुक्तालय अमरावती शहर व जिल्हयातुन तडीपार केलला इसम नामे महेश केशव नारायणी वय २१ वर्ष रा. मधुसुदन कॉलणी साईनगर अमरावती हा दिल्ली पब्लीक स्कुल कांती कॉलणी येथे फिरत असुन, त्याचे हातात घातक हत्यार असुन, तो त्याचा उपयोग करुन परिसरातील लोकांमध्ये दहशत पसरवित आहे अश्या माहितीचे आधारे सदर ठिकाणी राजापेठ पोलीस स्टेशन येथे डी बी पथक यांनी सदर तडीपार इसमास ताब्यात घेवुन त्याचे जवळुन एक स्टिलचा चायना चाकु कि. अंदाजे ५०० रु जप्त करण्यात आले असुन, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन राजापेठ येथे अपराध क ६९०/२०२६ कलम ४/२५ आर्म अॅक्ट, सहकलम १४२, १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा नुसार गुन्हा नोंद करण्यात आला.

पुढील तपास सुरु आहे. तसेच यापुढेही तडीपार तसेच हातात शस्त्र घेवुन दहशत पसरविण्या-या इसमाविरुध्द य कार्यवाही सुरु राहणार आहे.

# काळरात्र, नदीचे रौद्र रुप अन् 'देवदूतांचे' आगमन!

## जिल्हा शोध व बचाव पथकाच्या साहसी शौर्याची थरारक कहाणी; एकाच रात्री दोन आव्हानांचा यशस्वी मुकाबला

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अमरावती :** ज्यावेळी चारी बाजूंनी मृत्यूचे थैमान सुरू असते, नद्यांचे रौद्ररूप मानवी वस्त्या कवेत घेण्यासाठी घोंगावत असते आणि काळोख्या रात्रीत आशेचा शेवटचा किरणही मावळत आलेला असतो; नेमक्या त्याच क्षणी स्वतःचा जीव मुठीत धरून मदतीला धावून येतात ते जिल्हाधिकारी कार्यालयाचे शोध व बचाव पथक!

30 जुलै 2026 च्या भयाण रात्री जिल्ह्यातील संग्रामपूर आणि राजुरा या दोन वेगवेगळ्या ठिकाणी निसर्गाच्या कोपाने 16 निष्पाप जिवांचा श्वास रोखून धरला होता. परंतु जिल्हा प्रशासनाचे नियोजन आणि रेस्क्यू टीमच्या शौर्यामुळे 16 जणांना मृत्यूच्या दाढेतून ओढून नवीन आयुष्य मिळवून देण्यात आले.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील संग्रामपूर येथे छतावर ताटकळलेल्या 9 जिवांना पुराचा वेढा घातला होता. गावालगत वाहणाऱ्या बेंबळा नदीने 30 जुलै रोजी रात्री भयानक रूप धारण केले. मुसळधार पावसामुळे नदीचे पाणी काही क्षणातच गावात घुसले. रात्री 11 वाजेच्या सुमारास पूर अचानक वाढल्याने गावातील नागरिक घरात अडकले आणि प्राण वाचवण्यासाठी त्यांनी छताचा आसरा घेतला. चारही बाजूंनी वेगाने वाहणारे पाण्याचे लोट आणि सतत वाढणारी पाण्याची पातळी अशा स्थितीत मृत्यूशी झुंज देणाऱ्या 9 नागरिकांच्या नजरा केवळ मदतीच्या आशेने अंधाराकडे लागल्या होत्या.

ही माहिती मिळताच जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षात चक्रे वेगाने फिरली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या तात्काळ आदेशाने, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सुरेंद्र रामेकर यांच्या थेट मार्गदर्शनाखाली रेस्क्यू टीम रात्री 12.10 वाजता सर्व साहित्यानिशी घटनास्थळी पोहोचली.

छतावर अडकलेली माणसे खाली अथांग पसरलेला पुराच्या पाण्याचा अक्राळविक्राळ पसारा पाहून अक्षरशः थरथर कापत होती. पण जेव्हा अंधारात रेस्क्यू टीमच्या टॉर्चचा प्रकाश आणि बोटीचा आवाज त्यांच्यापर्यंत पोहोचला, तेव्हा 'आपण वाचलो' या भावनेने त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

रात्रीची वेळ, अंधार आणि पाण्याचा तुफान वेग यामुळे बोट चालवण्यात प्रचंड अडचणी येत होत्या. परंतु पथकातील सदस्यांनी अत्यंत धैर्याने व शांतपणे नागरिकांना धीर दिला. वयस्कर व्यक्ती आणि लहान मुलांना प्रथम प्राधान्य देत, एकापाठोपाठ 9 जणांना सुरक्षित बोटीत बसवून पाण्याच्या तावडीतून बाहेर काढले व प्रशासनाच्या स्वाधीन केले. हनुमंत उके (वय 34), रवी मेश्राम (वय 38), सुभाष भोईर (वय 40), सतीश मारभते (वय 28), आशिष उके (वय 18), गौरव मारबले (वय 22), ओम गिरी (वय 18), अमोल भोयर (वय 29), अनिकेत केवट (वय 25) यांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. या मोहिमेत विशाल निमकर, कौस्तुभ वैद्य, पी. एस. गायकवाड, गणेश कायदेकर, सुरज ठाकूर, दीपक भोईटे, मनीष उताणे, गोकुळ मुंडे यांचा समावेश होता.

राजुरा येथील मोखड नदीमध्ये बचाव पथकाने सापांचा सामना करून 2 वर्षांच्या चिमुकल्याला सुखरूप वाचविले. रात्री 8.35 वाजल्याच्या सुमारास राजुरा येथील मोखड नदीच्या पुरामध्ये 7 जण अडकल्याची नियंत्रण कक्षाला मिळाली.


परिस्थितीचे गांभीर्य ओळखून दुसरे आपत्ती व्यवस्थापन पथक रात्री 9:20 वाजता घटनास्थळी तातडीने दाखल झाले. येथील परिस्थिती अत्यंत आव्हानात्मक आणि भीतीदायक होती. काळोख्या अंधारात नदीच्या तुफान प्रवाहात लाकडाचे मोठे दांडके, झाडेझुडपे आणि पाण्याच्या प्रवाहासोबत वाहून आलेले विषारी साप फिरत होते. अशा मृत्यूच्या छायेत पथकातील गोताखोरांनी जराही विलंब न करता रबर बोट पाण्यात उतरवली. पाण्याच्या तावडीत अडकलेल्या या 7 जणांमध्ये 4 महिला, 2 पुरुष आणि अवघ्या 2 वर्षांचे बाळ होते.

स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता, विषारी साप आणि तरंगत्या लाकडाच्या अडथळ्याना भेदत पथकाने अवघ्या 30 मिनिटांत मोखड नदीच्या पात्रातून 7 जणाना सुखरूप बाहेर काढले. जेव्हा 2 वर्षांच्या चिमुकल्या अनन्याला रेस्क्यू टीमने बोटीतून सुरक्षित जमिनीवर आणले, तेव्हा उपस्थिताच्या छातीतील ठोका चुकवणारा काळजीचा क्षण संपून सर्वांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे भाव तरळले.

मोखड नदीच्या पुरातून साहेबराव जाधव, सावित्री जाधव, पूनम जाधव, जेतालाल जाधव, अनन्या जाधव (वय 2 वर्षे), सोनम जाधव, रीना जाधव यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. राजुरा मोहिमेतील सचिन धरमकर, आकाश निमकर, मुकेश सदाशिव, सचिन पवार, चैतन्य पोहाणे, प्रफुल भुसारी, अजय आसोले, आपदा मित्र तुळशीराम गोडाणे, भूषण काळे यांचा समावेश होता.

या दोन्ही थरारक शोधकार्यादरम्यान महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले. रात्रीच्या वेळी पार पडलेले हे रेस्क्यू ऑपरेशन पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. निसर्गाच्या भीषण कोपापुढे जेव्हा सामान्य माणूस हतबल होतो, तेव्हा स्वतःचा जीव धोक्यात घालून निष्पाप जिवांचे रक्षण करणाऱ्या अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शोध व बचाव पथकातील या 'रक्षक देवदूतांचे' सर्वत्र कौतुक होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार, दि. २ ऑगष्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com









# वाशीम ग्रामीण पोलिसांच्या कारवाईत ...

# अवैध गुटखा

# वाहन चालकाला फटका, मुख्य सूत्रधाराची सुटका !

*** गुटखा आणि वाहन असा ७ ते ८ लाखांचा मुद्देमाल जप्त * कारवाईत मुख्य तस्कराचे नाव दडपल्याची चर्चा !**

● नाजीर शेख @ वाशीम ●

रिसोड रोडवर गुटख्याने भरलेला वाहन वाशिम ग्रामीण पोलिसांनी पकडला आहे. या वाहनात आर एम डी आणि विमल कंपनीचा गुटखा मिळून आला आहे. याप्रकरणी वाशिम ग्रामीण पोलिसांनी मिळून आलेला अवैध गुटखा आणि वाहन असा अंदाजे एकूण ७ ते ८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून सोमवारी अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी आल्यानंतर संबंधित आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.सध्या या प्रकरणातील आरोपी चालकाला समज पत्र देऊन सोडण्यात आले असून सोमवारी पुन्हा बोलविण्यात आले आहे.या कारवाईमुळे गुटखा माफियामध्ये एकच खळबळ उडाली असली तरी मात्र, या कारवाईनंतर अवैध गुटख्यावर कारवाईचा चटका लागला असला तरी, याचा फटका केवळ वाहन चालकाला बसला असून मुख्य गुटखा तस्कराची सुटका झाल्याची चर्चा जिल्ह्यात होत आहे.

दि १ ऑगस्ट शनिवार रोजी वाशिम ग्रामीण पोलिसांना माहिती मिळाली होती की, रिसोडकडून वाशिमकडे एका वाहनातून शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा येत आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी रिसोड रोडवरील उड्डाण पुलाखाली नाकाबंदी केली.नाकाबंदी दरम्यान एमएच-३७ .टी - ४८७६ क्रमांकाचे सुप्रीमो कंपनीचे चारचाकी वाहन संशयितरीत्या येताना दिसले. पोलिसांनी वाहन थांबवून चालकाची चौकशी केली असता, त्याने आपले नाव रुपेश पवार रा. रिसोड जि.वाशिम असे सांगितले. त्यानंतर वाहनावरील ताडपत्री हटवून झडती घेतली असता मोठ्या प्रमाणात आर एम डी व विमल कंपनीचा अवैध गुटखा आढळून आला.याप्रकरणी पोलिसांनी वाहनासह गुटखा जप्त करून अंदाजे ७ ते ८ लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात ठेवण्यात आला असून पुढील कारवाईसाठी अन्न व औषध प्रशासनाला कळविण्यात आले आहे.अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी सोमवारी आल्यानंतर संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. दरम्यान, चालक रुपेश पवार याला समजपत्र देऊन सोडण्यात आले असून सोमवारी पुन्हा हजर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.या कारवाईमुळे जिल्ह्यातील गुटखा तस्कर आणि माफियांमध्ये एकच खळबळ उडाली असली तरी मात्र, गुटखा कुठून आला आणि या अवैध गुटखा वाहतुकीमागील मुख्य तस्कर कोण आहे.




याबाबतची महत्त्वपूर्ण माहिती वाहन चालकाने वाशिम ग्रामीण पोलिसांना दिली आहे. पण या कारवाईत संबंधित मुख्य गुटखा तस्कराचे नाव समोर येऊ नये यासाठी काल मोठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणातील केवळ वाहन चालकावर कारवाई करून मुख्य सूत्रधाराचे नाव जाणीवपूर्वक दडपले जाणार हे निश्चित झाला असल्याचा आरोप नागरिक करीत आहे.दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून केवळ वाहन चालकावरच नव्हे तर रिसोड येथील अवैध गुटखा तस्करीचा मुख्य सूत्रधार 'तापडिया' नामकवर देखील कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.आता कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक आणि अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सत्य समोर आणावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा जिल्हा वासियांकडून व्यक्त केली जात आहे. कारण या आधीही रिसोड येथील याच मुख्य गुटखा तस्करावर वाशिम स्थानिक गुन्हे शाखेने कोटी रुपयांचा गुटखा जप्त करून कारवाई केली होती.त्यामुळे आता तरी मुख्य तस्कराला जेरबंद करून मोक्का सारखी कारवाई होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### देश भक्त विजयजीत गौतम प्रतापराव यांचे स्वागत



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील कळंबा बोडखे येथील विश्वजीत गौतम प्रतापराव यांनी भारतीय सैन्याच्या महार रेजिमेंट मध्ये तब्बल १७ वर्षे देशसेवा बजावल्यानंतर वाशिम जिल्ह्यातील आसेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कळंबा बोडखे गावचे सुपुत्र विजयजीत गौतम प्रतापराव आपल्या मायगावी परतले. त्यांच्या मंगरूळपीर येथे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी त्यांच्या कार्याला उजळा देत असताना सांगितले की, देशाच्या संरक्षणा साठी त्यांनी दिलेली १७ वर्षांची निःस्वार्थ सेवा संपूर्ण परिसरा साठी अभिमानाची बाब आहे.या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# तहसीलदार येतील, लेखी हमी देतील; तरच केनवडकर उपोषण मागे घेतील !

## ४ दिवसांनंतर प्रशासनाची केनवड उपोषणस्थळी धाव; नायब तहसीलदारांची समजूत अयशस्वी

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच कायम ठेवण्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या साखळी उपोषणाची धार चौथ्या दिवशीही कायम राहिली. चार दिवसांनंतर प्रशासनाने दखल घेत नायब तहसीलदारांना उपोषणस्थळी पाठविले. मात्र, 'तहसीलदारांनी स्वतः उपोषणस्थळी येऊन कार्यालय अन्यत्र हलविले जाणार नाही, याची लेखी हमी द्यावी; तरच उपोषण मागे घेऊ,' अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतल्याने समजूत काढण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

शनिवार (दि. १ ऑगस्ट) रोजी नायब तहसीलदारांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्यांना उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. यावेळी दूरध्वनीवरून तहसीलदारांशीही आंदोलनकर्त्यांची चर्चा करून देण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी तहसीलदारांनी स्वतः उपोषणस्थळी येऊन नागरिकांशी संवाद साधावा, अशी मागणी केली. मात्र, वेळेअभावी येणे शक्य नसल्याचे तहसीलदारांनी सांगितल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.तहसीलदारांनी अप्पर तहसील कार्यालय केनवड येथेच व्हावे, असा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याचे सांगितले.



प्रस्तावावर प्राप्त हरकतींचा अहवालही वरिष्ठांकडे सादर करण्यात आला असून अंतिम निर्णय शासन स्तरावर होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मात्र, केवळ तोंडी आश्वासन मान्य नसून लेखी हमी मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही, असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला. सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करून व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला.

केनवड हे परिसरातील २० ते २५ गावांचे प्रमुख प्रशासकीय, शैक्षणिक, आरोग्य व व्यापारी केंद्र असून बँका, शासकीय कार्यालये, बाजारपेठ आणि राष्ट्रीय महामार्गाची सुविधा असल्याने अप्पर तहसीलसाठी केनवड हेच योग्य ठिकाण असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, अद्याप लेखी आश्वासन न मिळाल्याने साखळी उपोषण सुरूच असून आता वरिष्ठ प्रशासनाच्या भूमिकेकडे परिसराचे लक्ष लागले आहे.




# प्रशासनातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गुणवंतांचा सन्मान !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी लोकाभिमुख, पारदर्शक आणि परिणामकारक प्रशासनासाठी समर्पित भावनेने कार्य करावे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचा सन्मान हा इतरांसाठी प्रेरणादायी ठरतो आणि सेवेची गुणवत्ता अधिक उंचावण्यास मदत करतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

महसूल दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते महसूल विभागातील विविध संवर्गातील उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. जिल्हास्तरीय निवड समितीने उल्लेखनीय कार्याच्या आधारे विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड केली असून, अनेकांची विभागीय आयुक्त पुरस्कारासाठी शिफारस



करण्यात आली आहे.

यानिमित्त उपजिल्हाधिकारी संवर्गात उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव आणि उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, तहसीलदार संवर्गात राजेंद्र पाटील व निलेश पळसकर, नायब तहसीलदार संवर्गात अनिल वाडेकर, सुनिल घोडे, रावसाहेब देशपांडे व सुनिल देशमुख यांचा गौरव करण्यात आला.तसेच लघुलेखक संवर्गात विनोद विसरकर व सुनिल क-हाळे, अव्वल कारकून संवर्गात गजानन उगले, गोरख इढोळे, सीमा गाडे, संजिवनी वानखडे, श्रीराम गवई आणि माधव शिंदे, मंडळ अधिकारी संवर्गात चंद्रशेखर मनवर, समाधान जावळे, आशा आदबणे व एन. एम. इंगळे यांचा सन्मान करण्यात आला.महसूल सहाय्यक संवर्गात गणेश ढोरे, किशोर पांडव, सुधाकर पडघान, दिलीप चोंडकर आणि प्रशांत देशपांडे, तलाठी संवर्गात शैलेश घोगरे, शिवकन्या कोतीवार, रेखा पटुकले, सुधीर कोल्हे आणि अश्विनी इंगोले, शिपाई संवर्गात विशाल नप्ते, विश्वनाथ घनघाव, अमोल लाहोरे, सुरेश लोखंडे, विलास चव्हाण, भास्कर गवळी आणि गणेश चौके यांचा गौरव करण्यात आला.याशिवाय वाहन चालक संवर्गात गजानन बडवे व किशोर इंगोले, कोतवाल संवर्गात रवि आरु, सचिन भगत, रुपाली गोरे आणि संदीप तागड, पोलीस पाटील संवर्गात छायाबाई डहाके, शामराव धाबे व राहुल कांबळे, तर नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन संवर्गात आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव करण्यात आला.

# पिंप्री सरहद्दचे वळण ठरतेय घातक; तातडीने उभारा दिशादर्शक अन् गतिरोधक !

## आयशर उलटून शेतकरी व दोन गाईंचा थोडक्यात बचाव; एका गाईला गंभीर दुखापत

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

जालना-पुलगाव राष्ट्रीय महामार्गावरील पिंप्री सरहद्द (ता. रिसोड) गावाजवळील धोकादायक वळणावर शनिवारी (दि. १ ऑगस्ट) सकाळी सुमारे १० वाजता आयशर उलटून अपघात झाला. यात शेतकरी व त्याच्या दोन गाईंचा थोडक्यात बचाव झाला, तर एका गाईला गंभीर दुखापत झाली. या घटनेनंतर वळणावर दिशादर्शक, सूचना फलक व आवश्यक ठिकाणी गतिरोधक उभारण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, एमएच-२०-ईएल-८१६५ क्रमांकाचे आयशर मालेगावहून मेहकरच्या दिशेने रिकाम्या काचेच्या बाटल्या घेऊन जात होते. तीव्र वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या मधोमध उलटले.याचवेळी पिंप्री सरहद्द येथील शेतकरी लक्ष्मण हजारे हे दोन गाईंसह रस्ता ओलांडत होते. वाहनातील रिकाम्या बाटल्या गाईंच्या अंगावर कोसळल्याने एका गाईला गंभीर दुखापत झाली. दुसरी गाय व हजारे थोडक्यात बचावले.या वळणावर यापूर्वीही अनेक अपघात झाले असून काही घटनांमध्ये जीवितहानीही झाली आहे. मात्र येथे पुरेसे दिशादर्शक, धोकादायक वळणाचे इशारे व वेगमर्यादा फलक नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने दिशादर्शक, सूचना फलक, रम्बल स्ट्रिप्स व आवश्यक ठिकाणी गतिरोधक उभारून कायमस्वरूपी सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

**माहिती मिळताचं घटनास्थळी बीट जमादार दाखल.**

अपघाताची माहिती मिळताच शिरपूर पोलीस ठाण्याचे बीट जमादार वानखेडे व ब्राह्मण पोलीससह कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. आयशर रस्त्याच्या मधोमध उलटल्याने एका बाजूची वाहतूक ठप्प झाली होती. पोलिसांनी तत्काळ वाहतुकीचे नियोजन करून वाहनांना दुसऱ्या मार्गिकेतून सुरक्षित मार्ग दिला. शिरपूर पोलिसांच्या तत्परतेमुळे काही वेळात महामार्गावरील वाहतूक सुरळीत झाली.

# मला बुद्ध सांगणारा 'गाडगेबाबा' हरपला !


इथल्या रंडक्या सरकारी व्यवस्थेने सुमारे १४ हजार सरकारी शाळा बंद करण्याचा घाट घातला होता.माझ्यासह अनेक सहकारी मित्र व्यथित झाले होते.आम्ही काही जण सरकारसोबत दोन हात युद्ध करण्याची भाषा करत होतो, तसं नियोजन करत होतो.शेवटी ८ जानेवारी २०२३ ही तारीख ठरली शाळा आणि शिक्षण वाचवण्यासाठी आम्ही सर्वजण अक्षरशः धावपळ करत होतो.जिल्ह्यात अंतरराज्य शाळा-शिक्षण बचाव परिषदेचे नियोजन जोरात सुरू होते.शाळा -जल -जंगल -जमीन वाचवण्यासाठी आयुष्य झोकून दिलेले विविध राज्यातून जागतिक ख्यातीचे तज्ञ येणार होते. वातावरण भारलेलं होतं.

आणि त्या सगळ्या धावपळीत, प्रत्येक कामात, प्रत्येक निर्णयात, प्रत्येक पावलावर एक पाऊल पुढे असणारा माझा भाऊ आमच्या सोबत होता - पी. एस. खंदारे ,गजानन धामणे, मी व चळवळीशी जोडलेली शेकडो शाळां, ग्रामसभाना भेटी देत होतो, ठराव जोडत होतो. कोणताही कार्यक्रम असो पी. एस. यांची



वेशभूषा ठरलेली , त्यांचा साधेपणा, त्यांची निष्ठा - सगळं ठरलेलं असायच.गाडगेबाबांचा कर्मयोग त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसायचा.चळवळीत अनेक माणसं पाहिली, अनुभवली पण पूर्णवेळ स्वतःला झोकून देणारे अपवादच असतात आणि पी. एस. हे त्या अपवादांपैकी एक होते. हल्ली मृत्यूच्या बातम्या रोजच कानावर येतात. त्या शब्दात मांडता येतातष्ठकिंबहुना तशी प्रथा पडतेय! पण काही बातम्या अशा असतात, ज्या थेट काळजाला भिडतात. आज तसंच काहीसं झालंय शब्द हरवले आहेत,मन सुन्न झालं आहे. बाहेर



आकाश निरभ्र आहे.. रात्रं मात्र गहिवरून आलीय. मी लिहतोय.. पुन्हा खोडतोय मनाचा गहिवर शब्दात कसा मांडायचा.कारण आज आपण केवळ एक व्यक्ती गमावलेली नाही,तर एक चालती-बोलती विचारधारा हरवली आहे.पी. एस. खंदारे सर, गेली अनेक दिवस ते मृत्यू सोबत संघर्ष मांडत होतें. त्यांच्या सहवासात रूळलेले शेकडो हात मदती साठी धावाधाव करत होतें. कठोर नियतीला निक्षुन बोलणारा,अंधश्रद्धेच्या अंधारात विवेकाची ज्योत पेटवणारा तो दीप आज शांत झाला. पण त्याने पेटवलेल्या हजारो ज्योती आजही तेजाने प्रज्वलित आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली ती परिषद यशस्वी झाली. आज त्या आठवणीचाच आधार उरलाय समाजप्रबोधनासाठी त्यांनी स्वतःचं संपूर्ण आयुष्य झोकून दिलं. माझ्या मोप गावात त्यांच प्रबोधन मला ठेवायचं होतं. आम्हांला बुद्ध गये ला सोबत जायचं होतं. सर आपण निघून गेलात आणि आपल्या सोबतचा हा प्रवास थांबला. पण आपल्या सहवासातील प्रबोधनाचा विचार मात्र आमच्या रक्तात मिसळलाय , हि मशाल आम्ही कधीच विझू देणार नाही. वाशिमच्या मातीतला एक 'बाप माणूस' आज हरपला आहे. कारण माणूस जातो, पण विचार कधीच मरत नाहीत, पी. एस. खंदारे सरांना अश्रुपूर्ण शिवांजली.

**गजानन खंदारे,**
शिक्षण बचाव समन्वय समिती वाशिम

# कारंजा तहसीलमधील तिघांचा विभागीय स्तरावर गौरव

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

महसूल विभागात उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल कारंजा तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार अनिल विठ्ठलराव वाडेकर,मंडळ अधिकारी चंद्रशेखर दगडूजी मनवर आणि ग्राम महसूल अधिकारी शैलेश शिवराम घोगरे या तिघांचा विभागीय स्तरावर गौरव करण्यात आला.महसूल दिनानिमित्त १ ऑगस्ट रोजी अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित कार्यक्रमात विभागीय आयुक्त नयना गुंडे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.महसूल विभागातील क्षेत्रीय स्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये कारंजा तहसील कार्यालयातील तीन अधिकारी-कर्मचाऱ्यांची उत्कृष्ट कामगिरीसाठी निवड झाली.एकाच तहसील कार्यालयातील तिघांना विभागीय स्तरावर सन्मान मिळाल्याने कारंजा तहसीलच्या कार्याची विभागीय पातळीवर दखल घेतली गेली आहे.निवासी नायब तहसीलदार अनिल वाडेकर,मंडळ अधिकारी चंद्रशेखर मनवर आणि ग्राम महसूल अधिकारी शैलेश घोगरे यांनी महसूल विभागातील



महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कामगिरीची दखल

विविध कामकाजात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्याची दखल घेत विभागीय स्तरावर गौरव झाल्याने कारंजा तहसील कार्यालयाच्या कामकाजात योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.कारंजा तहसीलदार रवी महाले यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी महसूल विभागाचे विविध कामकाज प्रभावीपणे पार पाडत आहेत.विभागीय स्तरावर झालेल्या या तिघांच्या गौरवाबद्दल तहसीलदार रवी महाले तसेच तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.या कार्यक्रमाला अपर आयुक्त सूरज वाघमारे, सहाय्यक आयुक्त वैशाली पात्रे,अपर आयुक्त जाधव यांच्यासह महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# सेवा सहकारी सोसायट्या विकासाचे केंद्र बनवा...

## जिल्हा बँकेच्या कार्यक्रमात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे आवाहन

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला:** सेवा सहकारी सोसायट्या राजकारणाचे अड्डे न बनवता विकासाचे केंद्र बनल्या पाहिजेत, अशा परखड शब्दांत सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी आरसा दाखवला असून, शेतकऱ्यांना 'एआय' आणि तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके द्वारा आयोजित सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ संचालक डॉ. संतोषकुमार कोरपे होते. व्यासपीठावर बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे, आमदार अमित झनक, माजी मंत्री सुभाषराव ठाकरे, उपाध्यक्ष राम ठाकरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.




अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने आयोजित सत्कार सोहळ्यात राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील बोलत होते. ही दिलेली कर्जमाफी हीच शेवटची कर्जमाफी असल्याचे सांगत, त्यांनी शेतकऱ्यांना बदलत्या बाजारपेठेनुसार पीक नियोजन करण्याचा सल्ला दिला. आगामी काळात राज्यात नवा सर्वसमावेशक सहकार कायदा लागू केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमात बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे यांनी बँकेच्या कामगिरीचा आढावा घेतला. तर आमदार अमित झनक यांनी प्रामाणिक शेतकऱ्यांना ५० हजारांपेक्षा जास्त आर्थिक मदत देण्याची मागणी केली. कार्यक्रमाला डॉ. संतोषकुमार कोरपे यांच्यासह अनेक सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी गटसचिव नियमित करण्याच्या निर्णयाचे स्वागत करत, आता सचिवांसोबतच सेवा सोसायट्यांची जबाबदारीही वाढल्याचे स्पष्ट केले. प्रत्येक सेवा सोसायटीने सचिवांच्या वेतनाइतका नफा कमावण्याचे उद्दिष्ट ठेवले पाहिजे. त्यासाठी व्यवस्थापन, प्रशिक्षण आणि आर्थिक शिस्त आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी तालुका पातळीवर देखरेख संघ, जिल्हा सहकार बोर्डाला बळकटी आणि प्रशिक्षण यंत्रणा मजबूत करण्याची मागणी केली.

कार्यक्रमाला जिल्हा बँकेचे संचालक रामेश्वर ठाकरे, संचालिका उषाताई हिंगणकर, शोभाताई झनक ,अपर्णाताई धोत्रे, गीताबाई ठाकरे ,कल्पनाताई पाचपोर, विश्वनाथ ताथोड, अरविंद इंगोले, ललित बहाळे, रामेश्वर वाघ, गोपाल काकड, अनिल कुमार जाधव, संदीप खारोडे, डॉ. धीरज देशमुख, डॉक्टर अभिषेक तिडके, धनंजय गोरे, अजिंक्य राऊत, नितीन जाधव, जावेद पटेल , विभागीय सहनिबंधक अमरावती गौतम वर्धन, विभागीय सहनिबंधक ऑडिट सुदाम रोडगे, अकोला जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य,अंगद महाराज सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती.



## संकष्टी चतुर्थीनिमित्त गणेश मंदिरांत भाविकांची गर्दी

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**अकोला :** आषाढ कृष्ण पक्षातील संकष्टी चतुर्थीनिमित्त शहरातील गणेश मंदिरे तसेच श्री संत गजानन महाराज मंदिरांमध्ये रविवारी भक्तिमय वातावरणात उत्सव साजरा करण्यात आला. पहाटेपासूनच गणरायाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभर अभिषेक, पूजा-अर्चा, आरती, भजन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

जठारपेठ परिसरातील श्री सिद्धिविनायक गणेश मंदिर, कौलखेड येथील गणेश मंदिर, जुन्या शहरातील श्री संत गजानन महाराज मंदिर तसेच शहराच्या मध्यवर्ती भागातील वर्धमान भवन शेजारील प्राचीन स्वयंभू गणेश मंदिर येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त विशेष धार्मिक विधी पार पडले. या कार्यक्रमांचा शेकडो भाविकांनी लाभ घेत श्री गणरायाचे दर्शन घेतले.

यावेळी अनेक भाविकांनी उपवासाचे पालन करून चंद्रोदयानंतर गणपतीची पूजा केली. तसेच संकटांचे निवारण, कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी आणि आरोग्यासाठी श्री गणेश चरणी प्रार्थना अर्पण केली.

## भाविकांनी गायगावपर्यंत केली पदयात्रा

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**अकोला :** शहरापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या गायगाव येथील श्री गणेश मंदिरात आषाढ कृष्ण पक्षातील संकष्टी चतुर्थीनिमित्त श्री गणेशाच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. "ॐ गं गणपतये नमः" या मंत्राचा अखंड जप आणि भजन-कीर्तनाच्या गजरात शेकडो भाविकांनी अकोल्यातून गायगावपर्यंत पदयात्रा काढत भक्तिमय वातावरण निर्माण केले. पदयात्रेपूर्वी भाविकांनी शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर महाराजांचे दर्शन घेतले. त्यानंतर डाबकी रोडवरील श्री संत गजानन महाराज मंदिर तसेच रेल्वे गेट परिसरातील अनोखा हनुमान मंदिरात दर्शन घेऊन पदयात्रेला प्रारंभ झाला. हिरव्यागार शेतांच्या सान्निध्यात, टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि गणरायाच्या भजनांच्या तालावर नाचत-गात भाविक गायगाव येथे पोहोचले. मंदिरात श्री गणेशाच्या चरणी मनोकामना व्यक्त करत पुष्प अर्पण करून दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थीनिमित्त मंदिरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे ५ वाजता वेदमंत्रांच्या घोषात श्री गणेशाचा दुग्धाभिषेक, पूजन व महाआरती करण्यात आली. दुपारच्या सत्रात महिला भजनी मंडळांनी गणरायाच्या भक्तिरसपूर्ण भजनांनी वातावरण भक्तिमय केले. अकोला शहरासह परिसरातील अनेक गावांतील भाविकांनी मोठी गर्दी केली. सायंकाळी ६ वाजता सामूहिक महाआरती संपन्न झाली.

## मंगरूळपीर पोलिसांची कारवाई चोरीची बुलेट नांदेडमधून हस्तगत



प्रतिनिधी २ ऑगस्ट

**मंगरूळपीर :** मंगरूळपीर पोलीस ठाण्यात दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी चोरीला गेलेली बुलेट मोटारसायकल नांदेड येथून हस्तगत केली. या प्रकरणातील २५ वर्षीय आरोपी सचिन तुळशीराम शिंदे, रा. आनंदनगर, नांदेड यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मंगरूळपीर पोलीस ठाण्यात या प्रकरणी अशोक नगर येथील इरफान शेख यांची बुलेट चोरी गेल्याची फिर्याद दाखल करण्यात आली होती. याप्रकरणी अपराध क्रमांक ६२७/२०२५, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान पोलिसांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे नांदेड येथे कारवाई करीत आरोपीला चोरीच्या बुलेट मोटार सायकल सह ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचा पोलिसांनी ताबा (पीसीआर) मिळविला असून, या प्रकरणात पुढील तपास पोलीस निरीक्षक किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनात रफिक मांजरे, मनीष आडे, पीएसआय वसंत ठाकरे करीत आहे.

## जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने काम करावे : बाबासाहेब पाटील

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**अकोला:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अजितदादा पवार यांची जयंती आणि अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी भाषणामध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी यांनी एकजुटीने काम करावे असे आवाहन केले.

येथील विश्राम गृहात शत्रुघ्न बिडकर यांनी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस मदन भरगड, महिला काँग्रेस सरचिटणीस राधा बिडकर, हरिभाऊ वाघाडे राज्य उपाध्यक्ष ओबीसी सेल, प्रतिभा अवचार महिला राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष, विनोद कोगदे जिल्हा सेवा दल अध्यक्ष, संदीप पाटील, चंद्रकांत दादा पाटील अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस वाशिम, गजानन म्हैसणे अध्यक्ष जिल्हा समता परिषद, गजेंद्र काळे सचिव समता परिषद अकोला जिल्हा, विनोद मिरगे, विनोद कोगदे सेवादल अध्यक्ष, ओमप्रकाश सावल कार्याध्यक्ष शहर राष्ट्रवादी काँग्रेस प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

प्रथम स्वागतानंतर आपल्या प्रास्ताविकामध्ये शत्रुघ्न बिडकर यांनी गेल्या आठ दिवसापासून स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे जिल्ह्यामध्ये उपक्रम राबविण्यात आल्याचे सांगितले. आणि आज रोजी स्वर्गीय अण्णाभाऊ साठे समाज प्रबोधन कार्य करणारे व्यक्तीच्या दिवसानिमित्त जिल्ह्यातील समाज प्रबोधन करणारे शेख साहेब, योगेश वनारे, साक्षीताई पवार, ओम प्रकाश सावल यांचा सत्कार सहकार मंत्री यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी माजी महापौर मदन भरगड यांनी अकोला जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सक्रिय करण्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शत्रुघ्न बिडकर यांनी केले. सूत्रसंचालन श्रीराम पालकर तर आभार प्रदर्शन महादेव साबे यांनी केले. जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाशिम न. प.च्या दुकानाचे छत कोसळले!

**वाशिम :** नगर परिषदेच्या कॉम्प्लेक्समधील एका दुकानाचे छत कोसळल्याची घटना समोर आली आहे. ही घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून दुकान बंद असतांना छत कोसळल्याने जीवित हानी टळली.या आधीही नगर परिषदेच्या कॉम्प्लेक्स मधील काही छत कोसळल्याच्या घटना घडल्याने या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

शहरातील पाटणी चौक परिसरात असलेल्या रविवार बाजार नगरपरिषद शॉपिंग सेंटरमधील श्री स्टुडिओ या दुकानाचे पी ओ पी स्लॅपसह कोसळल्याची घटना समोर आहे. ज्यावेळी छत कोसळला तेव्हा अमोल वानखेडे यांचा स्टुडिओ बंद होता.त्यामुळे मोठी जीवित हानी होता होता टळली . मात्र दुकानाचे मोठे नुकसान झाले आहे. नगर परिषद प्रशासनाने या कॉम्प्लेक्सच्या निकृष्ट स्लॅबची त्वरीत दुरुस्ती करण्याची मागणी दुकान चालकांकडून होत आहे.

## अकोला जिल्हा स्त्री रुग्णालय राज्यात तिसऱ्यास्थानी




प्रतिनिधी २ ऑगस्ट

**अकोला:** आरोग्य विभागामार्फत महत्त्वाच्या आरोग्य निर्देशांकांच्या आधारे करण्यात आलेल्या संस्थांच्या राज्यस्तरीय क्रमवारीत जिल्हा महिला रुग्णालय, अकोला यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ८३ गुणांसह राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे. एप्रिल महिन्याच्या रँकिंगमध्ये मिळालेल्या या यशामुळे जिल्ह्याच्या आरोग्य सेवेत मानाचा तुरा रोवला गेला आहे.

हे यश उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचौरे आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापूराव पवार तसेच त्यांच्या संपूर्ण अधिकारी-कर्मचारी वर्गाने केलेल्या सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध परिश्रमांचे फलित असल्याचे मानले जात आहे.

राज्यस्तरीय मूल्यांकनामध्ये रुग्णालयातील नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधा, रुग्णांशी अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सुसंवाद, स्वच्छता, पारदर्शक कारभार, सेवा गुणवत्ता तसेच रुग्णाभिमुख उपक्रम अशा विविध निकषांचा समावेश करण्यात आला होता. या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे जिल्हा महिला रुग्णालयाने राज्यात तिसरा क्रमांक मिळविण्याचा मान पटकावला.

# मूर्तिजापुरातील अनेक नगरसेवक एकनाथ शिंदे गटाच्या वाटेवर?

## विकासकामांसाठी निधीअभावी नाराजी; राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

प्रतिनिधी २ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शहरातील राजकीय वर्तुळात सध्या एका संभाव्य राजकीय घडामोडीची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. मूर्तिजापूर नगरपरिषदेतील काही नगरसेवक आपल्या प्रभागातील विकासकामांसाठी अपेक्षित निधी उपलब्ध होत नसल्याने नाराज असल्याची चर्चा असून, ही नाराजी आगामी काळात शिवसेना शिंदे गटाच्या दिशेने राजकीय वाटचालीचे कारण ठरू शकते, अशी चर्चा शहरात रंगली आहे.




मूर्तिजापूर शहरातील विविध प्रभागांमध्ये रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे तसेच इतर मूलभूत सुविधांची कामे करण्यासाठी नगरसेवकांकडून सातत्याने निधीची मागणी केली जाते. मात्र, अपेक्षेप्रमाणे निधी उपलब्ध होत नसल्याने काही नगरसेवकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. आपल्या प्रभागातील नागरिकांच्या विकासाच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अडचणी येत असल्याने काही नगरसेवक नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर काही नगरसेवक महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाशी जवळीक साधण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. शिंदे गटाच्या माध्यमातून शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून घेता येईल आणि प्रभागातील रखडलेली विकासकामे मार्गी लावता येतील, असा काही नगरसेवकांचा विचार असल्याचे राजकीय चर्चेतून समोर येत आहे.

दरम्यान, सध्या कोणते नगरसेवक शिंदे गटात प्रवेश करणार, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, काही नगरसेवकांच्या संभाव्य राजकीय भूमिकेकडे शहरवासीयांचे लक्ष लागले असून, आगामी काळात मूर्तिजापूरच्या राजकारणात मोठी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नगर परिषदेमध्ये विकासकामांसाठी निधीचा प्रश्न हा आगामी काळात राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. नगरसेवकांनी पक्ष बदलण्याचा निर्णय घेतल्यास त्याचा परिणाम शहरातील स्थानिक राजकारणावर तसेच आगामी राजकीय समीकरणांवर होऊ शकतो.

## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**बुलढाणा :** सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी, गाऱ्हाणी आणि प्रशासकीय अडचणींचे वेळेत निराकरण करण्यासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सोमवार ३ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे 'जिल्हास्तरीय लोकशाही दिन' आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या मांडण्यासाठी या व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. नागरिक आपल्या तक्रारी आणि अर्ज ९४२३१८४८०४ या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर चॅटबॉटद्वारे देखील सादर करू शकतात. जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी या लोकशाही दिनाचा सकारात्मक लाभ घ्यावा, असे निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी कळविले आहे.

## 277 ग्रॅम मेफेड्रॉनसह आरोपीस अटक राजापेठ पोलीसांची उल्लेखनीय कामगिरी

प्रतिनिधी २ ऑगस्ट



**अमरावती :**२७७ ग्रॅम मेफेड्रोन (एम.डी) इग्स च्या सह पोलीस स्टेशन राजापेठ येथील गुन्हातील आरोपी नामे साहिल राजेश मेहरा यास साई हेरीटेज अकोली रोड इथून राजापेठ पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. राजापेठ पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी मानल्या जात आहे.

पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना दि. १ ऑगस्ट रोजी सांयकाळी ६ वाजता दरम्यान मिळालेल्या गुप्त बातमीदाराचे माहितीचे आधारे आरोपी साहिल राजेश मेहरा वय २२ वर्ष रा. शिवाजी संकुल, अकोली रोड, अमरावती हा दि. १.०८.२०२६ रोजी साई हेरीटेज अकोली अमरावती येथे त्याचे जवळ असलेल्या चारचाकी वाहनामध्ये मेफेडोन (एम. डी) इग्स हा अमली पदार्थ विक्री साठी बाळगुन त्याचा व्यवसाय करीत आहे, असे मिळालेल्या माहितीचे आधारे सदर ठिकाणी सापळा रचुन राजापेठ पोलीस स्टेशन येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण तसेच डी. बी पथक यांनी सदर ठिकाणी एम डी इग्सचा व्यवसाय करणारे इसमाची झडती घेवुन त्याचे कडुन मिळालेल्या २७७ ग्रॅम एम डी इग्स व विक्रीकरीता उपयुक्त साहित्य घेवुन आरोपी यास ताब्यात घेवुन सर्व कायदेशीर प्रकिया करुन पोलीस स्टेशन राजापेठ येथे आणुन गुन्हा नोंद करण्यात आला तसेच, सदर आरोपी हा पोलीस स्टेशन राजापेठ येथील गुन्हा नोंद क. १८५/२०२६ कलम ८(क), २१ (ब),२२ (ब),२८,२९ एन डी पी एस ॲक्ट मध्ये असुन, त्यास सदर गुन्हाचे तपासकामी सुध्दा कार्यवाही करीता पोलीस स्टेशन कार्यवाही करीता आणले आहे.

२७७ ग्रॅम मेफेड्रोन (एम.डी) इग्स नावाचा अंमलीपदार्थ किंमत अंदाजे ४१,५५,०००/रुपये जप्त केले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.

■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135